**बॉम्बे चष्माघर**
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१३० ■ सोमवार १७ फेब्रुवारी २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26

**उत्कृष्ठ क्वालिटी**
साबुदाणा ५५ रु.किलो
सेंद्रिय गुळ ५० रु.किलो
**सागर ड्रायफ्रुट**
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# दिल्ली रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरीत अठरा ठार महाकुंभला जाण्यासाठी भाविकांची प्रचंड गर्दी

**नवी दिल्ली, दि.१६- उत्तरप्रदेशच्या प्रयागराजमध्ये महाकुंभमेळा सुरू असून, दिल्लीतूनही मोठ्या संख्येने लोक महाकुंभात शाही स्नान करण्यासाठी जात आहेत. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरून महाकुंभासाठी येथून दोन विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. यामध्ये चढण्यासाठी मोठ्या संख्येने प्रवासी आल्याने प्लॅटफॉर्म क्रमांक चौदा आणि पंधरावर काल रात्री चेंगराचेंगरी झाली. या घटनेत अठरा जणांचा मृत्यू झाला तर दहापेक्षा जास्त प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. केंद्रीय मंत्री अश्विन वैष्णव यांनी या प्रकरणी ट्विट करत माहिती दिली आहे.**




शनिवारी रात्री नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाला आहे तर १० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. ही चेंगराचेंगरी प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर झाली. ही घटना रात्री ९.५५ वाजता घडली. खरंतर, कुंभमेळ्याला जाण्यासाठी नवी दिल्ली रेल्वे स्टेशनवर मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर प्रचंड गर्दी झाल्याने ही दुर्दैवी घटना घडली. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीनंतर प्रयागराज जंक्शनवरील सुरक्षा व्यवस्थाही कडक करण्यात आली आहे. रेल्वे स्थानक परिसरासह फूट ओव्हर ब्रिजवरील व्यवस्थेची जबाबदारीची सूत्रे आरपीएफ कर्मचाऱ्यांनी **(पान ४ वर)**

## अयोध्येला जाणारे चार भाविक अपघातात ठार

लखनौ, दि.१६- रविवारी पहाटे पूर्वांचल एक्स्प्रेसवेवर बंद पडलेल्या खासगी बसला ट्रॅव्हलर बसने पाठीमागून धडक दिली. या अपघातात महाराष्ट्रातून अयोध्येला ट्रॅव्हलरने जाणाऱ्या चार भाविकांचा मृत्यू झाला. तर सहा जण गंभीर जखमी झाले. घटनास्थळी आलेल्या पोलिसांनी मोठ्या परिश्रमाने गाडीमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढत त्यांना रुग्णालयात उपचाराकरिता पाठवण्यात आले. छत्तीसगडहून अयोध्येला भाविकांना घेऊन जाणाऱ्या खासगी बसमध्ये बिघाड झाला. त्यामुळे ही बस पूर्वांचल एक्स्प्रेस वेवर लोणी कटरा पोलिस स्टेशन हद्दीतील फुटा भवानीपूर गावाजवळ रस्त्यावर थांबविण्यात आली. पहाटे वाजण्याच्या सुमाराला महाराष्ट्रातील भाविकांना घेऊन मिनीबस **(पान ४ वर)**

# महाराष्ट्रात जीबीएसचा धोका वाढला; यंत्रणा अलर्ट सांगलीत दोघांचा मृत्यू; धुळ्यातही एकास लागण

**सांगली, दि.१६- महाराष्ट्रात सध्या गिलेन बॅरे सिंड्रोम अर्थात जीबीएसचा धोका वाढत आहे. रुग्णसंख्याही वाढत आहे. त्यात मृतांचा आकडा कमी होताना दिसत नाही. सांगलीमध्ये या आजारामुळे दोन जणांचा मृत्यू झाला. यामध्ये १४ वर्षांच्या मुलाचाही समावेश आहे. जीबीएसची लागण झालेले हे दोन्ही रुग्ण मिरजेतील शासकीय रुग्णालयात उपचार घेत होते. दरम्यान, धुळे शहरातही एक जीबीएसचा रुग्ण आढळला असून त्याच्यावर हिरे वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरु आहेत.**




मिरजेत मृत्यू झालेल्यात हुक्केरी (जि. बेळगाव) येथील १४ वर्षीय मुलाचा आणि सांगोला (जि. सोलापूर) येथील ६० वर्षांच्या महिलेचा समावेश आहे. पुणे, मुंबई, कोल्हापूर, सोलापूर, नागपूरनंतर आता सांगलीमध्येही जीबी सिंड्रोममुळे मृत्यूची नोंद झाल्याने राज्यातील एकूण मृतांची संख्या ११ वर पोहोचली आहे. सध्या राज्यात विविध रुग्णालयांत २० रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. सांगलीच्या मिरजमधील शासकीय रुग्णालयात गेल्या १५ दिवसांत जिल्हा व जिल्ह्याबाहेरील १५ रुग्णांवर उपचार सुरू होते. त्यापैकी ६ रुग्ण बरे झाले. त्यांना रुग्णालयातून घरी सोडले आहे.

दरम्यान, सध्या सात रुग्णांवर उपचार सुरू आहेत. एक रुग्ण पुण्याला, तर एक कराडला उपचारासाठी गेला आहे. १५ रुग्णांमध्ये सांगली शहरातील ३ रुग्णांचा समावेश आहे. शहरात चिंतामणीनगर, विश्रामबाग आणि संजयनगरमध्ये जीबीएसचे रुग्ण आढळले होते.

**पंढरपुरात दोन रुग्ण**

माघी यात्रेनंतर पंढरपुरात जीबीएसचे दोन रुग्ण आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. यानंतर आरोग्य विभागाची यंत्रणा खडबडून जागी **(पान ४ वर)**



## ग्रामसभेतून होणार जलसेवकाची निवड : कलशेट्टी यांची माहिती

**धुळे, दि.१६- केंद्राच्या माध्यमातून पाण्याच्या संदर्भात जनजागृती होण्यासाठी गल्लीपासून दिल्लीपर्यंत क्रांतिकारी पाऊल उचलले जात असून आजही देशातील जनता पाण्याविषयी साक्षर नसल्याची खंत जल साक्षर केंद्राचे मल्लिनाथ कलशेट्टी यांनी व्यक्त केली.**

राज्यातील जल साक्षरतेवर काम करणाऱ्या जल प्रेमींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. राज्यातल्या प्रत्येक गावातून एक असे ७ हजार ५७५ जलसेवक, प्रत्येक तालुक्यातून ३५१ जलदूत, ३४ जलप्रेमी, सहा जल योद्धा, सहा जल नायक इत्यादींची निवड केली जाणार असून जल सेवकांच्या माध्यमातून पाण्याचे अंदाजपत्रक, ताळेबंद व विविध उपक्रम सह ट्रेनिंग घेतले जाणार आहे. शालेय अभ्यासक्रमात देखील जल साक्षरतेवर परीपाठ असुन जल जीवन मिशनच्या माध्यमातून ५५ लिटर पाणी प्रत्येक मानसी प्रत्येक दिवशी दिले जाणार आहे. आजही उन्हाळ्यात टँकरची गरज पडते व पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाण्याची नासाडी होते. आपल्या गावात किती मिलिमीटर पाणी पडला हेही आपणास माहीत नसते. यासाठीच प्रत्येक गावात सेवाभावी पाण्यावर काम करणाऱ्या ध्येयवादी व्यक्ती, महिला, युवांची ग्रामसभेतून निवड करण्याचे आवाहन जलसाक्षरता केंद्राच्या माध्यमातून केले जात आहे. **(पान ४ वर)**

## धाडरेत दाम्पत्याला दोघांची मारहाण

धुळे, दि.१६- तालुक्यातील धाडरे गावात पाणी भरण्याच्या कारणावरून पाटील दाम्पत्याला दोघांनी शिवीगाळ करत लोखंडी रॉडने मारून जखमी केल्याची घटना घडली आहे. बारकु बोमा पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शेतात पाणी भरण्याच्या कारणावरून बारकु पाटील यांच्या पत्नीस हर्षल संजय पवार व दलाबाई संजय पवार रा.धाडरे ता.जि.धुळे या दोघांनी दि.१३ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता राहत्या घरासमोर शिवीगाळ केली. तसेच बारकु पाटील यांना लोखंडी रॉडने डोक्यावर, तोंडावर व कानावर मारून जखमी केले. याप्रकरणी तालुका पोलीस स्टेशनला दोघांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## श्री.शिवाजी विद्या प्रसारक संस्थेतर्फे आजपासून शिवचरित्र व्याख्यानमाला

**धुळे, दि.१६- सालाबादप्रमाणे यंदाही शिवजयंती निमित्ताने श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेने तीन दिवशीय शिवचरित्र व्याख्यानमालेचे आयोजन संस्थेच्या नॉर्थ पॉईंट इंग्लीश मिडीयम स्कूलच्या भव्य प्रांगणात केले आहे. सोमवार दि.१७ पासून या व्याख्यान मालेचा शुभारंभ होणार आहे.**

संस्थेचे आधारस्तंभ माजीमंत्री स्व.रोहीदास पाटील यांच्या प्रयत्नाने शिवजयंती तारीख १९ फेब्रुवारीच आहे याला शासन मान्यता प्राप्त झाली. त्याचप्रमाणे दाजीसाहेबांच्या संकल्पनेतून संस्था दरवर्षी तीन दिवशीय शिवचरित्र व्याख्यान मालेचे आयोजन करत आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष संस्थेचे चेअरमन मा.आ.कुणाल पाटील यांनी स्वतः लक्ष घालून ही व्याख्यानमाला सुरू ठेवली आहे. शिवचरित्र व्याख्यान मालेचे यंदाचे प्रथमपुष्प सोमवार दि.१७ रोजी गुंफले जाईल. त्याची गुंफन करतील महान शिवव्याख्याते निलेश चव्हाण. त्याचा विषय पुष्प असेल शिवरायांना का आठवावे? तर मंगळवार दि.१८ रोजी द्वितीय पुष्पाची गुंफन करतील महान शिवव्याख्याते **(पान ४ वर)**

## गांजा प्रकरणात आरोपीचा जामीन कोर्टाने नाकारला

धुळे, दि.१६- गधडदेव ता.शिरपूर येथे सुमारे वीस लाख एकोणपन्नास हजार रुपयांचा गांजा बाळगल्याप्रकरणी अटकेत असलेल्या कोकराज रेशा पावरा रा.गधडदेव ता.शिरपूर याचा जामीन अर्ज मे.जिल्हा व सत्र न्यायमूर्ती श्री.एस.आर.भगदले यांनी नामंजूर केला आहे. याबाबत धिक माहिती अशी की, कोकराज पावरा याने गधडदेव शिवारात डोंगरामध्ये असलेल्या त्याच्या मालकीच्या शेतात बेकायदेशीरपणे सुमारे एक हजार चोवीस किलो गांजाची लागवड केली होती. पोलिसांनी याठिकाणी छापा टाकून त्यास अटक केली. दि.२० जानेवारी रोजी **(पान ४ वर)**



## धुळ्यातील जीबीएसग्रस्त रुग्णाची खासदारांकडून आस्थेने विचारपूस

**धुळे, दि.१६- धुळे शहरात जीबीएसचा पहिला रुग्ण आढळला असून त्याच्यावर हिरे शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान कुत्रा चावल्याने जखमी बालिकेवर देखील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून खासदार डॉ.शोभा बच्छाव यांनी संबंधित रुग्णांची भेट घेत विचारपूस केली तसेच डॉक्टरांना आवश्यक उपचाराच्या सूचना केल्या आहेत. प्रत्येक नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन खासदार डॉ.बच्छाव यांनी यानिमित्ताने केले आहे.**

जीबीएस आजाराने महाराष्ट्रासह देशातील इतर भागातही शिरकाव केला असून दिवसेंदिवस त्याचा कहर वाढत आहे. धुळे शहरातही जीबीएसचा एक रुग्ण आढळून आल्याने आरोग्य यंत्रणा विशेष सतर्क झाली आहे. संबंधित रुग्णावर हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे उपचार सुरू आहेत. जीबीएस रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तयार करण्यात आला असून उपचाराच्याबाबत योग्य ती खबरदारी घेतली जात आहे. जीबीएसचा पहिला रुग्ण आढळल्याची माहिती प्राप्त होताच खासदार डॉ.शोभा दिनेश बच्छाव यांनी तात्काळ हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास भेट देत संबंधित रुग्णाची विचारपूस करीत संबंधितावर **(पान ४ वर)**

# वाचन संस्कृती वाढविण्यासाठी शासनाचे सहकार्य : ना.रावल परिसंवाद, कथाकथन, कवी संमेलनाने ग्रंथोत्सवाचा समारोप

**धुळे, दि.१६- सध्याच्या आधुनिक डिजिटल युगामध्ये नवनवीन तंत्रज्ञानामुळे वाचन संस्कृती लोप पावत आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजवून चांगले कवी, लेखक, विचारवंत, साहित्यिक, विचारवंत निर्माण करावे. वाचन संस्कृती वाढविण्यासाठी शासनाचे नेहमीच सहकार्य राहिल, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**




राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धुळे, ज्येष्ठांचे टोणगांवकर ग्रंथालय, दोंडाईचा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय धुळे ग्रंथोत्सवाचा समारोप आज संपन्न झाला. यावेळी पालकमंत्री रावल बोलत होते. कार्यक्रमास जिल्हा ग्रंथालय अधिकारी जगदिश पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ.संजीव गिरासे, साहित्य समिक्षक डॉ.फुला बागुल, प्राध्यापक डॉ.रमेश माने, अहिराणी कथाकार प्रविण माळी, साहित्यिक सुरेश मोरे, प्रभाकर शेळके, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार, नाशिक विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.दत्ता परदेशी, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाहक अनिल सोनवणे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री रावल म्हणाले की, आज जग वेगाने बदलत आहे आणि इतक्या वेगाने बदलते की एक गोष्ट आपल्याला समजण्याच्या अगोदर दुसरे काही नवनवीन तंत्रज्ञान येत आहे. आज सोशल मीडिया, व्हॉट्सअप संपत नाही तोवर ए.आय हे नवीन तंत्रज्ञान आले आहे. या तंत्रज्ञानाचा मोठा परिणाम वाचन संस्कृतीवर होत आहे. आजच्या युवा पिढीचे वाचन कमी झाले आहे. इंग्रजांनी २०० वर्षापूर्वी देशात इंग्रजी भाषा आणली आणि या इंग्रजी भाषेत आपण सर्व जण गुरफुटून गेलो आहे. यामुळे आज आपण अहिराणी, मराठी भाषा बोलणे विसरून चाललो आहे. या भाषेला टिकविण्यासाठी आपण सर्वांनी जाणीवपूर्वक प्रयत्न आणि कष्ट आपल्याला करावे लागणार आहे. मुलांना अहिराणी थोडीफार यायला पाहिजे ते शिकविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. अहिराणी असो, मराठी असो ही आपली स्वत:ची भाषा प्रत्येकाला येणे आवश्यक आहे. सांस्कृतिक वारसा असणारे भारत वर्ष आपल्याला निर्माण करण्यासाठी आपल्या सगळ्यांना प्रयत्न करावे लागणार आहे. येत्या काळात जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून तसेच राज्य शासनाच्या माध्यमातूनही वाचनालयासाठी **(पान ४ वर)**

## लाडक्या बहिणींचे उत्पन्न आयकर विभाग शोधणार

**मुंबई, दि.१६- मध्य प्रदेश सरकारप्रमाणे महाराष्ट्र सरकारने सुरु केलेली लाडकी बहीण योजना चर्चेचा विषय बनली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत महिन्याला १५०० रुपये दिले जात आहेत. राज्यभरातील लाखो महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाले आहेत. लाडकी बहीण योजनेबाबत सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.**

यामुळे लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची संख्या आणखी कमी होण्याची शक्यता आहे. लाडकी बहिण योजनेतील अपात्र महिलांची नावे कमी केली जाणार आहे. यासाठी सरकार इन्कम टॅक्स विभागाच्या मदतीने जास्त उत्पन्न असलेल्या महिलांचा शोध घेणार असल्याचे समजते. जास्त उत्पन्न असताना या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची नावे वगळली जाणार आहेत. विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांना वगळल्यानंतर आता अडीच लाखांहून **(पान ४ वर)**

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -78,100 रु.+3% GST
सोने- 24 K -85,200 रु.+3% GST
चांदी- 99,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# सोनगीर वि.का.सोसायटीची निवडणूक प्रक्रिया पूर्ण ग्रामस्थांनी सर्वसंमतीने ठरवून दिलेले उमेदवार विजयी

**सोनगीर, दि.१६ (प्रतिनिधी)- येथील विकास कार्यकारी सहकारी संस्थेच्या कार्यकारी मंडळाची पंचवार्षिक निवडणूकीसाठी रविवार (दि.१६) रोजी मतदान संपन्न झाले. मतदान झाल्यानंतर लगेच संध्याकाळी निकाल घोषित करण्यात आला. यात गावकऱ्यांनी सर्व संमतीने ठरवून दिलेले उमेदवार निवडून आलेत.**



सन १९१६ नंतर पहिल्या येथील विकास कार्यकारी सहकारी सोसायटीची निवडणूक सभासदांनी मतदान केले. ११० वर्षांत संस्थेच्या पंच कमिटीच्या सर्व निवडणुका बिनविरोध पार पडल्या आहेत. मात्र सन २०२५-३० या पंचवार्षिक निवडणुकीत आठ जागांसाठी मतदान झाले. यावेळी संस्थेच्या ६५७ सभासदांमधून १३ उमेदवार निवडले जातात. यावेळी यासाठी ७२ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने यंदा निवडणुकीत मतदान होते की काय अशी शंका उपस्थित केली जात होती आणि झाले ही तसेच. दरम्यान काही राखीव जागांसाठी निवडणूक बिनविरोध पार पडली. यात अनुसूचित जाती जमाती या प्रवर्गासाठी राखीव असलेल्या एका जागेसाठी **(पान ४ वर)**

## अल्पसंख्यांक शाळा, महाविद्यालयांना अनुदान प्रस्तावासाठी बावीसपर्यंत मुदत

**धुळे, दि.१६- धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्यता प्राप्त अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित खाजगी अल्पसंख्यांक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका, नगरपरिषद शाळा व दिव्यांग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. या अनुदानाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या संस्थांनी २२ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत प्रस्ताव सादर करावे. असे आवाहन सदस्य सचिव, उच्चस्तरीय निवड समिती तथा जिल्हा नियोजन अधिकारी छ. रा. कनगरे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.**

धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचे बहुल असलेल्या शासनमान्य शैक्षणिक संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी पात्र शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांना पायाभूत सोईसुविधा निर्माण करण्यासाठी शासनाकडुन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. संस्थेकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन शासनास अनुदानासाठी शिफारस करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमार्फत उपरोक्त शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या निकषांनुसार तपासणी करुन पात्र प्रस्तावांची शिफारस शासनास करण्यात येईल. सन २०२४-२०२५ या **(पान ४ वर)**

# नंदुरबारमध्ये पुढाऱ्यांचा आपापल्या पक्षवाढीवर भर पालिका अन् जि.प.निवडणुकीसाठी छुपी चाचपणी


**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- राज्यात भाजपा, शिंदे शिवसेना व अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात युती असली तरी नंदुरबार जिल्ह्यात तीनही पक्षाच्या नेत्यांत निवडणूकीपासूनच मतभेद आहेत. आगामी पालिका व जि.प. निवडणूकीच्या संदर्भात सर्वच पक्षांच्या नेत्यांनी चुप्पी साधली असून जिल्हयात त्या त्या परिस्थितीनुसार युती करायची की स्वतंत्र लढायचे हे तत्कालीन परिस्थितीवर निर्णय घेण्यात येणार आहे. तुर्तास तीनही पक्षाचे पदाधिकारी हे सदस्य नोंदणी अभियान व पक्ष मजबूतीकडे लक्ष देत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील सर्वच पक्षाच्या नेत्यांचे आगामी पालिका व जि.प. निवडणूकीत सत्ता स्थापनेसाठी छुप्या पध्दतीने चाचपणी सुरु आहे.**

विधानसभा निवडणूकीच्या निकालानंतर राजकीय नेते आता जि.प. व पालिका निवडणूकीच्या तयारीला लागले असून संपर्कमंत्री जयकुमार रावल यांनी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आपसातील मतभेद विसरून एकजूटीने कामाला लागावे असे आवाहन केले आहे. तर जिपची सत्ता पुन:श्च भाजपाच्या ताब्यात घेण्यासाठी आमदार डॉ विजयकुमार गावित यांनी कंबर कसली असून चाळीस जागांवर यश मिळवण्यासाठी त्यांच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. ते विविध कार्यकर्त्यांशी संवाद साधत असून जनमत जाणून घेत आहेत. तर माजी आमदार चंद्रकांत रघूवंशी हे शिंदे शिवसेनेच्या सदस्य नोंदणी मोहीम अभियानात गुंतले आहेत. सेनेचे संघटन वाढविण्यावर त्यांचा सध्या भर दिसत आहे. भाजपाने देखील सदस्य नोंदणी मोहीम जोमात सुरु केली आहे.

विधानसभा निवडणूका संपल्यानंतर अनेक दिवस मंत्रीपदी कुणाची वर्णी लागणार यावर खलबते सुरु होती. नंदुरबार जिल्हयाला एकही मंत्रीपद न मिळाल्याने सद्या हा जिल्हा राजकीय दृष्टया सुस्त. झाला आहे. नंदुरबार जिल्हयाचे संपर्कमंत्रीपद जयकुमार रावल यांच्याकडे असल्याने सर्व कार्यकर्ते त्यांना भेटून आपली कामे मार्गी लावण्यासाठी संपर्कात आहेत. शिंदे शिवसेनेने गाव तिथे शाखा या उपक्रमावर भर दिला असून युवा सेनेच्यावतीने सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे.तसेच महामंत्री विजय चौधरी,भाजपाचे जिल्हाध्यक्ष निलेश माळी यांनी भाजपा सदस्य अभियान राबविण्यावर भर दिला आहे.तर मंत्रीपद हुकलेल्या डॉ. गावित यांचे पुढील लक्ष्य जिल्हा परीषद आहे.तसेच सहकार्यांच्या मदतीने जिल्हा परीषदेत जवळपास ४० जागा भाजपाच्या हातात घेण्याचे लक्ष्य त्यांनी ठेवले आहे.

भाजपातील गटबाजी दुर ठेवून एकजूटीने एका दिलाने पक्ष मजबूतीकडे लक्ष दयावे,असे मंत्री जयकुमार रावल यांनी मार्गदर्शन केल्याने भाजपाचे कार्यकर्ते विविध बैठकांना उपस्थिती देत आहे.जळगाव येथील कार्यशाळेत त्यांना मार्गदर्शन करण्यातआल्याने भाजपात चैतन्य संचारले आहे. तर शिंदे सेनेतही मोठे उत्साहाचे वातावरण आहे. दुसऱ्या बाजूला **(पान ४ वर)**

## १५ वे पुण्यस्मरण



**कै. आप्पासो. शिवदास भिला चौधरी**

(मा. अध्यक्ष महाराष्ट्र मुद्रण परिषद) (स्वर्गवास दि. १७/२/२०१०)

राहील आठवण सदा तुमची लाभो तुमच्या आत्म्यास शांती लाभो
हिच विनंती परमेश्वरासी हिच श्रध्दांजली व सुमनांजली तुम्हाला स्मृतीदिनी

* * * * * आपले शोकाकुल * * * * *

श्रीमती कल्पना सुनिल चौधरी

| | |
|---|---|
| श्री. यतिष सुनिल चौधरी | सौ. दिशा यतिष चौधरी |
| श्री. मनिष सुनिल चौधरी | सौ.श्रेया मनिष चौधरी |
| श्री. नगराज शंकर चौधरी | सौ. सुनिता नगराज चौधरी |
| श्री. सचिन सुधाकर देसाई | सौ. शितल सचिन देसाई |
| कु. माही(मनस्वी) यतीष चौधरी | चि. राजविर यतिश चौधरी |

**समस्त चौधरी (वाघ) परिवार, धुळे.**

**आपला महाराष्ट्र**

# रात्रीचा समय सरून दीप तेज मंद झाला

महाराष्ट्रात शास्त्रीय गायनाची तसेच नाट्यसंगीताची मोठी परंपरा आहे. कारण आपल्याकडे चोखंदळ रसिक आहेत. संगीत सौभद्र सारख्या नाटकाला दीडशे वर्षाहून अधिक काळ व्हावा आणि तरीही ते नाटक आणि त्या नाटकातील गीते आजच्या पिढीने पसंत करावीत हे नाट्य गीतांचे यश म्हणावे लागेल. सौभद्र मधील शेवटचे गाणे महाराष्ट्र भर फार गाजले. एखाद्या गायकाने हे गाणे आपल्या कलोपासनेच्या एकूण आयुष्यात तब्बल ४० ते ४५ वर्षे गावे हा पराक्रम देखील महाराष्ट्रात घडला. पंडित प्रभाकर कारेकर यांनी प्रिये पहा, रात्रीचा समय सरूनी येत उष:काल हा, प्रिये पहा हे गीत अजरामर करून टाकले. प्रिये पहा कोणी म्हणावे तर ते प्रभाकर कारेकर यांनीच म्हणावे असे एक समीकरण तयार झाले होते. पंडित प्रभाकर जनार्धन कारेकर परवा म्हणजे बुधवारी अनंतात विलीन झाले. रात्रीचा समय सरुनी येत उष:काल हा ह्या ओळी त्यांनी अजरामर केल्या खऱ्या परंतु त्यांच्या निधनाने त्यांच्यासाठी उष:काल होता होता काळरात्र आली अशा त्या उलट अर्थाने आल्या. थंडगार वात सुटत, दीपतेज मंद होतं, दिग्वदने स्वच्छ करीत, अरुण पसरी निज महा अशा ओळी कानावर पडल्या म्हणजे ते गीत प्रभाकर कारेकरच गाणार हे ठरलेले होते. आणि चोखंदळ रसिक त्यांची गायकी बरोबर ओळखत असत. वयाच्या ८० व्या वर्षी देखील त्यांच्या आवाजात एक धार होती. संगीताचे शिक्षण त्यांनी तीन गुरूंकडून घेतले. आणि स्वत:ची अशी स्वतंत्रशैली विकसित केली. त्यांचे गुरु पंडित सुरेश हळदणकर यांनी त्यांना सांगितले की गाणे फक्त महाराष्ट्र पुरते शिकायचे नाही तर ते संपूर्ण देशभर चालेल असे शिकायचे. त्यानुसार पंडित प्रभाकर कारेकर यांनी गाण्यातील अनेक प्रकार आत्मसात करून देशभर गायले. एवढेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय वादकां सोबत आणि गायकांसोबत त्यांनी कार्यक्रम केले. त्यातून प्युजन संगीत विकसित केले. अशा प्रकारचे आगळे वेगळे त्यांचे कलाविश्व होते. उत्कृष्ट गायकी, आंतरराष्ट्रीय गायकीत वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी, उत्कृष्ट शिक्षक, नाट्यगीत, भजने, ठुमरी आणि मुख्यत: शास्त्रीय गायकी असे बहुविध गायन प्रकार त्यांनी हाताळले. रसिकांना ते पसंत पडले. ते कुठेही गायले, काहीही गायले तरी रसिक त्यांना प्रिये पहा हे नाट्यगीत गायल्याशिवाय सोडत नव्हते. इतके ते लोकांच्या पसंतीस पडले होते. त्यांना तानसेन सन्मान, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, लता मंगेशकर पुरस्कार, गोमांत विभूषण पुरस्कार, असे मोठमोठे सन्मान मिळाले. हे सगळे सन्मान त्यांच्याकडे चालत आले. ते स्वत: त्यामुळे मोठे झाले आणि ते सन्मानही त्यांच्यामुळे मोठे झाले. एवढा मोठा हा कलावंत होता. गोव्यात जन्मलेले कारेकर शाळेच्या गॅदरिंग मध्ये गायले. लोकांना ते आवडले. त्यांनी त्यांच्या वडिलांना सांगितले की मुलाला गायकीचे शिक्षण घेण्यासाठी मुंबईला पाठवा. त्या काळात गोव्यात पोर्तुगीजांची राजवट होती. मुंबईला जाणे सोपे नव्हते. पण वडिलांनी ती व्यवस्था केली. आणि ते थेट पंडित सुरेश हळदणकर यांच्याकडे पोहोचले. त्या काळात गायन क्षेत्रात दिग्गज कलावंत होते त्यापैकी एक हळदणकर होते. तेव्हा गायनाची जिज्ञासा असणाऱ्या शिष्यांना गुरुगृही ठेवून घेण्याची पद्धत होती. कारेकर यांना हळदणकरांनी घरीच ठेवून घेतले. दहा वर्षे प्रभाकर कारेकर गुरुगृही शिकले. अनेक प्रकार त्यांनी आत्मसात केले. त्यांच्याकडे पंडित मल्लिकार्जुन मन्सूर, कुमार गंधर्व यांच्यासारख्या मोठ्या गायकांची हजेरी लागत असे. त्यांची गायकी कारेकर यांना ऐकायला मिळाली. त्यातून त्यांचे गाणे समृद्ध होत गेले.

शिष्य कसा असावा या संदर्भातील उत्तम उदाहरण म्हणून प्रभाकर कारेकर यांच्याकडे बघावे लागेल. हळदणकरांकडे ते दहा वर्षे शिकले, त्यानंतर पंडित जितेंद्र अभिषेकी बुवा यांच्याकडे नऊ वर्षे शिकले आणि ग्वाल्हेर घराण्याचे ख्यातनाम गायक पंडित व्यास यांच्याकडे बराच काळ शिकले. तब्बल वीस वर्षे शिक्षण घेण्याची तयारी ठेवून शिकणे, आणि शिकून गुरुची कॉपी न करता गुरुची गायन पद्धती कायम ठेवून स्वत:ची अशी स्वतंत्र शैली निर्माण करणारे फारच कमी कलावंत होते. त्यात कारेकर अग्रभागी म्हणावे लागतील. पं. विष्णू दिगंबर पलुस्कर, विष्णू नारायण भातखंडे, यांची संगीत शिक्षण पद्धती महाराष्ट्रात रूढ आहे. संगीत हे आता बहुजना पर्यंत पोहोचले आहे. पूर्वी विशिष्ट वर्गाची त्यात मक्तेदारी होती. ते मोडून गाणे आता सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचले आहे. पूर्वी ते फक्त दरबारात होते. दरबारातून बाहेर निघण्यास बराच काळ लागला. पण निघाल्यानंतर बहुजनातील बरेच कलावंत ख्यातकीर्त झाले. त्यांनी अभ्यासाकडे म्हणजेच रियाजाकडे लक्ष दिले. त्यांना शिकवणारे गुरुदेखील शास्त्रीय संगीताचे ज्ञान अर्धवटपणे देत नसत. आता मात्र तसे झाले आहे. संगीत विशारद आणि अलंकार अशा उच्च गाण्याच्या परीक्षा देणारे, मोजक्या काही रागांचा अभ्यास करून उत्तीर्ण होतात. अर्ध्या हळकुंडाने पिवळे होतात. त्यांना ना ताल असतो ,ना सूर असतो. असे अर्धवटराव या क्षेत्रात टिकत नाहीत. जे आत्मसात करतात, आणि गुरुही त्यांना भरभरून देतात अशी एक पिढी महाराष्ट्रात सध्या गाजते आहे. नव्या दमाचे अनेक गायक आणि गायिका शास्त्रीय गाण्यात, उपशास्त्रीय गाण्यात, प्रसिद्धी पावले आहेत. म्हणून हा कला व्यवहार केवळ शौक म्हणून पूर्ण करता येत नाही. तर तो आत्मसात करण्यासाठी पूर्णपणे त्यात झोकून द्यावे लागते तरच त्याचे गाणे रसिक पसंत करतात. पंडित प्रभाकर कारेकर हे त्यातले एक होते. नाट्यगीतात राधारण मधुमिलिंद जय जय, रमा रमण हरी गोविंद जय जय, शतजन्म शोधीताना, मर्म बंधातली ठेव ही, झाले युवती मना दारुण रण, चंद्रिका ही जणू, नभ मेघांनी आक्रमिले, अशी नाट्यगीते आणि दिनांची माऊली अजी म्या देखिली, बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल, अशी भजने त्यांनी गायली. नाट्यगीते आणि भजने हे प्रकार अनेकांनी हाताळले आहेत. मात्र झाले बहु होत बहु परंतु या सम हाच असे म्हणता येऊ शकेल अशी कारेकर यांची खासियत होती.

पु.ल.देशपांडे यांनी एक कार्यक्रम त्या काळात तयार केला होता. संगीत शकुंतल ते सौभद्र अशा नाट्य प्रवासावर चा हा कार्यक्रम होता. त्यात त्यांनी विविध गायकांना गाण्याची संधी दिली. त्यावेळी कारेकर यांना सौभद्र मधील प्रिये पहा हे नाट्यगीत गाण्याचे पुलंनी सांगितले. स्वत: ते त्यांनी शिकवले. भरगच्च नाट्यगृहात रसिकांनी त्या गाण्याला पसंती दिली. आणि ते गाणे नंतर ४०-४५ वर्षे आपण गायले. लोकांनी खूप डोक्यावर घेतले अशी आठवण वयाच्या ७५ व्या वर्षी दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी सांगितलेली आहे. त्यांना स्वर प्रभाकर असेही म्हणत असत. तेवढी त्यांची लायकी त्यांनी प्रस्थापित केलेली होती. कारेकर यांच्या समकालीन असंख्य गायक आणि गायिका महाराष्ट्रात विशेषत: मुंबई पुण्यात होऊन गेल्या. त्यांची नामावली मोठी आहे. या प्रत्येकाचे स्वत:चे वेगळे असे वैशिष्ट्य होते. प्रत्येकाची एक गायन शैली होती. ती त्यांनी पुढच्या पिढीला हस्तांतरित केली. आज जी पिढी गायन क्षेत्रात क्षेत्रात नावाजलेली आहे. त्यांची गायकी रसिकांनी पसंत केलेली आहे. तानसेन समारोह असेल,, भीमसेन समारोह असेल, गंधर्व महोत्सव असेल, त्या सगळ्या ठिकाणी हे कलावंत हजेरी लावतात. नुसती हजेरी लावत नाहीत तर चोखंदळ रसिकांना ते भरभरून आनंद देतात. त्या बाबत महाराष्ट्र समृद्ध आहे. गायन ,वादन ,नृत्य, नाट्य ही क्षेत्रे नव्या कलावंतांनी काबीज केली आहेत. आयकॉन वगैरे स्पर्धा ठीक आहेत. पण गायकी ही गुरु शिवाय शक्य नाही. हे आत्मसात करण्या इतका अभ्यास आवश्यक असतो. आणि तो दीर्घकाळ करावा लागतो. आता पालक म्हणतात आमच्या पाल्याला एक महिन्यात गाणं शिकवा. आणि परीक्षेत बसवा. त्याला सर्टिफिकेट गरजेचे आहे. प्रत्यक्षात त्याला काहीच येत नाही अशी अवस्था आहे. गुरु ही तसेच आहेत. जे अपवाद आहेत त्यांचे शिष्य या क्षेत्रात चमकले आहेत. पंडित प्रभाकर कारेकर यांनी आपल्या गायकी सोबतच आपल्या शिष्यांना भरभरून दिले. शिष्यांनी ते आत्मसात केले. दोघेही एकमेकांना पूरक ठरले. या सर्वांनी मिळून महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जिवंत ठेवली आहे. प्रभाकर कारेकर यांच्यासारखे बहुआयामी गायक आता होणे नाही. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# खानदेशातील अहिराणी साहित्य : उत्साहवर्धक व आशादायी प्रारंभ..

## ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने...

दिल्ली येथील तालकटोरा मैदानावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन होत आहे. मराठी भाषा व साहित्याच्या इतिहासात किंबहुना भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात मराठीचे संमेलन देशाच्या राजधानीत होणे ही समस्त मराठी जनांसाठी आनंदवर्धक बाब आहे. विशेषत्वाने मराठी भाषेला नुकताच मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा या पार्श्वभूमीवर होणारा हा राष्ट्रीय साहित्योत्सव मराठी रयतेला प्रचंड सुखावणारा आहे. खान्देशातील नावाजलेले साहित्यिक डॉ. फुला बागुल यांनी खान्देशातील अहिराणी भाषा साहित्य यावर आपले व्यक्त केलेले मत....

अहिराणी ही धुळे, जळगाव, नंदुरबार या खानदेशातील तीन जिल्ह्यांत राहणाऱ्या लोकांसह गुजरातेतील व्यारा, सोनगड, बारडोली, उधना येथे खानदेशातून स्थलांतरित झालेल्या लोकांची तसेच मध्य प्रदेशातील सेंधवा, खेतिया भागात राहणाऱ्या लोकांची बोली आहे. यासह नाशिक जिल्ह्यातील कळवण, सटाणा, मालेगाव, देवळा या तालुक्यातूनही अहिराणी बोलली जाते. साधारण दीड दोन कोटी लोकांची ती बोली असल्याचे म्हटले जाते. प्राचीन राजे अभीर यांच्यापासून तिचा ऐतिहासिक वारसा सांगितला जातो. शिलालेखासह व मध्ययुगीन ग्रांथिक पुरावे देखील दिले जातात. प्राचीन अहिराणी लोकगीते देखील अहिराणीच्या प्राचीनत्वात भर घालतात. अहिराणीचा प्रवास प्राचीन काळापासून प्रमाण मराठी सोबतच होतो आहे. प्रमाण मराठीच्या अंतर्गत असलेली अहिराणी ही सर्वात प्रमुख व क्षेत्र बहुल बोली आहे. प्रमाण मराठीच्या तुलनेत अहिराणी साहित्याची वाटचाल मात्र अलीकडे साहित्य निर्मिती सुरू झाल्यामुळे मर्यादित आहे. अहिराणी साहित्याच्या वाटचालीचा आरंभबिंदू शिलालेखातील या ओळी असा मानला जातो .

संत ज्ञानेश्वरांनी बागलानी अहिराणीत लिहिलेली ओवी (मी तं बाई साधी भोयी/ गऊ त्याना जवयी/फाडी मनी चोयी) हा अहिराणी साहित्याचा भरभक्कम ग्रांथिक पुरावा होय. मध्ययुगीन अहिराणी कवी निंबा चा उल्लेख येतो तथापि, अजून त्यांचे अहिराणी साहित्य मिळून आल्याचे ऐकिवात नाही.

अर्वाचीन काळात अहिराणी साहित्याच्या प्रारंभाचा मान निर्विवादपणे दा. गो. बोरसे यांना दिला जातो.

खानदेशातील विविध लेखक, कवी, समीक्षकांनी पुढीलप्रमाणे अहिराणी व अहिराणी संदर्भातील साहित्य निर्मिती करून हा प्रवाह आरंभिला आहे.

**अहिराणी काव्यसंग्रह पुढीलप्रमाणे-**

१ ) मी कान्हाना देसनी ... वनमाला पाटील ...अजिंक्य प्रकाशन, वापटा, जि. वाशिम २ )नियतीना सूड .. लतिका चौधरी .. अपेक्षा प्रकाशन, भुसावळ ३ ) वानोया.. चंद्रकला बाविस्कर .. ४ ) राम पाऱ्हाना राम .. नानाभाऊ पाटील .. कस्तुरी प्रकाशन, अमळनेर ५ ) वयंबा .. सुभाष आहिरे .. भावना प्रकाशन, धुळे ६ ) पाठवरना हात .. प्रा . आ . न . पाटकरी .. पुष्पा प्रकाशन, धुळे ७) आदिम तालनं संगीत .. सुधीर देवरे .. भाषा संशोधन प्रकाशन केंद्र, बडोदा ८ ) पारसमनी .. पारसमल जैन .. प्रकाशक, निला जैन ९ ) आपली माय अहिराणी .. प्रा . आ . न . पाटकरी, प्रकाशक सौ . पुष्पा पाटकरी १० ) खानदेशी मेवा .. प्रा . विमल वाणी .. प्रकाशक शंतनु येवले ११ ) पुरनपोयी ... रमेश बोरसे .. राऊ प्रकाशन, धुळे १२ ) रापीनी धार .. वाल्मिक अहिरे .. प्रज्ञेश प्रकाशन, पुणे १३ ) गावगाडा .. एन एच महाजन .. तिसरी आवृत्ती, अनुराग प्रकाशन, शिरपूर १४ ) मी आनी मना आवकाया .. पप्पू पाटोळे, प्रकाशक स्वरूप बोरसे १५ ) लाह्या .. नानाभाऊ माळी ..भावना प्रकाशन, धुळे १६ ) मिरीगना पानी ... भगवान अहिरे ... चौखंबा प्रकाशन, धुळे १७ ) अभिरानी .. शकुंतला पाटील .. अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव १८ ) सरगम .. शंकर पवार .. दीक्षा प्रकाशन, धुळे १९ ) नियं आभाय .. लतिका चौधरी .. कस्तुरी प्रकाशन, अमळनेर २०) मन्हा मामाना गावले जाऊ (बाल कविता) .. आबा महाजन, अथर्व प्रकाशन, जळगाव

**अहिराणी कादंबऱ्या पुढील साहित्यिकांनी लिहिल्या आहेत.**

१ ) कायी माय .. गोकूळ बागूल .. द्वि आ . कस्तुरी प्रकाशन, अमळनेर २ ) आख्खी हयाती .. बापूराव देसाई ... सरस्वती प्रकाशन, नाशिकरोड ३ ) लगीन ... संजीव गिरासे ... राजश्री प्रकाशन, पुणे ४ ) आक्का .. राजाजी देशमुख ... दीपाली प्रकाशन, नाशिक ५ ) गलीनी भाऊ बंदकी .. लतिका चौधरी ६ ) देव बोकड्यानी माणुसकी .. प्रकाश महाले डॉ बापुराव देसाई यांच्या अन्य अहिराणी कादंबऱ्याही आहेत. अमीना या कादंबरीचा अहिराणी अनुवादही झाला आहे.

**अहिराणी कथा संग्रह पुढील लेखकांनी निर्मिले आहेत.**

१ )बठ्ठा बजार येडासका ... गोकूळ बागूल ... कस्तुरी प्रकाशन, अमळनेर याच संग्रहाचे नाव बदलून (ज्वारी म्हनी माय) पुनर्प्रकाशित करण्यात आला. २ ) गोधडीनी उब .. प्रा . आ . न . पाटकरी .. अंकुर प्रकाशन, अकोला ३ ) गोठ पाटल्या .. सौ. रतका पाटील .. भावना प्रकाशन, धुळे ४) पसात - मच्छिंद्र वाघ , राहूल बूक, नाशिक ५) भोवरा - डॉ ज्ञानेश दुसाणे

**अहिराणी ललितगद्य या प्रांतातही पुढील लेखकांनी आपले योगदान दिले आहे.**

१ ) आख्यान .. रामदास वाघ ...प्राजक्ता प्रकाशन, नाशिक २ ) गावनं गावपन .. सुभाष आहिरे .. भावना प्रकाशन, धुळे ३ ) आप्पान्या गप्पा .. रमेश बोरसे .. अभ्यासिका प्रकाशन, कन्नड ४ ) चांगभलं .. प्रा भगवान पाटील .. कस्तुरी प्रकाशन, अमळनेर ५ ) वानगी ... रामदास वाघ .. प्राजक्ता प्रकाशन, नाशिक ६ ) आप्पान्या गप्पा (भाग दोन ) . रमेश बोरसे .. अभ्यासिका प्रकाशन, कन्नड ७ ) माय नावना देव .. रामदास वाघ .. प्राजक्ता प्रकाशन, नाशिक ८ ) खान्देशी बावनकशी .. लतिका चौधरी ... दिशोत्तमा प्रकाशन, नाशिक ९ ) आगारी . संजीव गिरासे ... सुधा प्रकाशन, जळगाव

**अहिराणी नाट्य या प्रवाहात लिखित संहिता फक्त एकच आढळते अन्य नाटय रूपे प्रत्यक्ष सादर केली जात आहेत.**

१ ) राम राम भावड्या ... प्रा . बी . पी . राजपूत .. प्रकाशक सौ छाया राजपूत, होळनांथे २ ) पांडोबा आणि फिरस्ता (संवाद लेखन) ..आत्माराम मुंगा पाटील ३) बुध्याना पोऱ्यानी मानता हा अहिराणी एक पात्री प्रयोग सुभाष आहिरे तर आयतं पोयतं सख्यानं हा अहिराणी प्रयोग प्रवीण माळी आणि खानदेसनी माटी हा प्रयोग प्रतिभा साळुंके सादर करतात.

**अहिराणी समीक्षा या प्रांतांत डॉ फुला बागूल यांचे अग्रक्रमीय योगदान आहे.**

१ ) खारं आलनं ... . फुला बागूल, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव. या समीक्षा ग्रंथाला पुरस्कारांनी गौरविले गेले आहे. उच्चशिक्षणातही अभ्यासघटक म्हणून या ग्रंथाचा समावेश आहे. अहिराणी साहित्याच्या समीक्षेचे निकष या ग्रंथाने स्थापित केले आहेत.

अहिराणी आत्मकथन पुढील लेखकांनी लिहिले आहे. शांताई ... सुभाष आहिरे .. भावना प्रकाशन, धुळे

अहिराणी अनुवाद या प्रांतातही काही लेखकांनी योगदान दिले आहे . उडाणेकर श्री सुभाष यांनी व जालन्याच्या वनमाला पाटील यांनी गीतेची अहिराणी भाषांतरे केली आहेत. प्रा आ. न. पाटकरी यांचे प्रयत्नही स्तुत्य आहेत.

१ ) संत मीरानी भक्ती .. प्रा. भगवान पाटील.. पानफूल प्रकाशन, जळगाव २ ) अमिना (मूळ उर्दू कादंबरी, मोहम्मद उमर) अथर्व प्रकाशन, जळगाव अहिराणी संमेलनाची अध्यक्षीय भाषणे देखील पुस्तिकेच्या रूपात प्रकाशित आहेत. १ ) पाचवे अ.भा.अहिरानी साहित्य संमेलन.. सुभाष आहिरे.. प्रकाशक, खान्देश विकास प्रतिष्ठान, धुळे

**अहिराणी संकलने देखील पुढील लेखकांनी प्रकाशित केली आहेत.**

१ ) अहिराणी दर्शन. प्रा. सदाशिव माळी .. शिवमूर्ती प्रकाशन, धुळे २ ) कानबाई माता गीत संग्रह.. रामचंद्र सदाशिव व सौ शोभा रामचंद्र चौधरी.. मुद्रक का स वाणी संस्था, धुळे ३ ) कानोड जागर.. प्रा. विमल वाणी.. मुद्रक अक्षरा ऑफसेट, भडगाव ४ ) अहिरानी मायबोली.. चंद्रकांत कोळी, प्रकाशक सौ. भारती शिरसाठ, देवळाई ५ ) जाईचा सुगंध ... अशोक चौधरी, कस्तुरी प्रकाशन, अमळनेर ६ ) लग्न सोहळा .. शकुंतला पाटील. अथर्व प्रकाशन, जळगाव ७ ) अहिराणी बोली भाषेतील जात्यावरील ओव्या.. डॉ छाया निकम.. अथर्व प्रकाशन, जळगाव ८ ) उपकार माऊलीना खरा . प्रा . अशोक शिंदे .. वर्षा प्रकाशन, विसरवाडी ९ ) अहिराणी वाग्वैभव ... अभिमन्यू पाटील .. कस्तुरी प्रकाशन, अमळनेर

अहिराणी संदर्भातील संशोधन पर ग्रंथ (मराठी भाषेतून) पुढील प्रमाणे होत.

**किमान दहा पीएच. डी. प्रबंध अहिराणीवर सादर झाले आहेत.**

१ ) आभीरायण .. गंगाधर पारोळेकर .. प्रकाशक सौ मीनाक्षी पारोळेकर, पुणे २) खानदेशातील ग्राम दैवते आणि लोकगीते .. डॉ सयाजी पगार, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे ३) खानदेशी : एक स्थानिक अभ्यास.. डॉ विजया चिटणीस, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे ४ ) अहिराणी म्हणी:अनुभवाच्या खाणी.. डॉ. बाळासाहेब गुंजाळ, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर ५ ) बागलाणी लोकगीते आणि लोक संस्कृती .. डॉ सुरेश पाटील, प्रज्ञा प्रकाशन, नाशिक ६ ) समाज भाषाविज्ञान: बोलींचा अभ्यास (अहिराणी बोली) डॉ सुधाकर चौधरी, अथर्व प्रकाशन, जळगाव ७ ) अहिराणी लोक साहित्याचा अभ्यास .. डॉ शशिकांत पाटील, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद ८ ) अहिराणी : भाषा वैज्ञानिक अभ्यास.. डॉ रमेश सूर्यवंशी .. अक्षय प्रकाशन, पुणे ९ ) खानदेशी स्त्री गीते .. डॉ उषा सावंत .. प्रतिमा प्रकाशन, पुणे ) खानदेशी अहिराणी लोककथा .. डॉ . बी . एन . पाटील, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव ) अहिराणी लोक वाङ्मयातील लोक भाषा .. डॉ म. सु. पगारे.. प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव

**अहिराणी शब्दकोश देखील प्रकाशित झाला आहे.**

१ )अहिराणी शब्दकोश .. डॉ रमेश सूर्यवंशी .. अक्षय प्रकाशन, पुणे अहिराणी संकीर्ण ग्रंथ / पुस्तिका मराठीतून लेखन देखील प्रकाशित झाले आहेत . १ ) अहिराणी लोकपरंपरा . डॉ सुधीर देवरे .. ग्रंथाली प्रकाशन, मुंबई २ ) खानदेशी साहित्य सुरभी .. डॉ . बापूराव देसाई .. प्रकाशक शंतनु कुलकर्णी ३ ) खान्देशी संस्कृती ... डॉ . बापूराव देसाई .. पानफूल प्रकाशन, जळगाव ४ ) अहिरराष्ट्र कान्हदेश .. श्री देविदास हटकर .. मुद्रक .. राजयोग डिजिटल, कल्याण अशा रीतीने साहित्याच्या सर्व प्रकारात खानदेशातील अहिराणी लेखकांनी आपली निर्मिती करून अहिराणी साहित्याचा हा प्रवाह समृद्ध करण्याचा संकल्प घेतला आहे.

**डॉ.फुला बागुल**
सदस्य विद्वत परिषद
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र
विद्यापीठ, जळगाव.
मो.९४२०६०५२०८/
९८२२९३४८७४

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

# नंदुरबार जिल्ह्यात परीक्षा केंद्रांवर मनाई आदेश लागू; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (१० वी) परीक्षांच्या पार्श्वभूमीवर परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार रोखण्यासाठी आणि परीक्षा सुरळीत पणे पार पाडण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी गोविंदा दाणेज यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश जारी केले आहेत.**


या आदेशानुसार, परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात परीक्षेशी संबंधित नसलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या प्रवेशास प्रतिबंध असेल. तसेच, परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, सायबर कॅफे, सार्वजनिक टेलिफोन, एस.टी.डी., आय.एस.डी., फॅक्स केंद्र आणि ध्वनीक्षेपके बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे आदेश १५ फेब्रुवारी ते ४ एप्रिल या कालावधीसाठी लागू राहतील. १२ वी आणि १० वीच्या परीक्षांच्या दिवशी सकाळी ८ ते सायंकाळी ६ पर्यंत हे निर्बंध लागू असतील. परीक्षा नेमणूक केलेले कर्मचारी, अधिकारी, पोलीस व परिक्षार्थी यांचे व्यतिरिक्त प्रतिबंधीत क्षेत्रात कोणासही प्रवेश करता येणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.




## उन्ह तापू लागले

धुळे, दि.१६- शहरासह जिल्ह्यात उन्हाचा तडाखा जाणवू लागला आहे. तापमानात देखील वाढ होत आहे. रात्री मात्र गारवा कायम आहे. पहाटेच्या सुमारास जोरदार थंडीही जाणवत आहे. आणखी महिनाभर असे वातावरण राहिल. यानंतर मात्र कडाक्याचा उन्हाळा सुरु होणार असल्याने पंखे, एसीना मागणी वाढत आहे.

### शब्दकोडे क्रमांक.२०९१



**आडवे शब्द :** १.वातड ४.हळूहळू ६.बहीणीचा मुलगा ८.औषध ९.शोध ११.कंबर १२.फुलातील पराग कण १४.वनात राहणारी मोल मंजुरी करुन निर्वाह करणारी एक जमात १६.आंब्याचा रस १८.धनी २०.मनुष्य २२.इंग्रजीत-खोल २५.फा□दा २७.सुरवात २८.हिंदीत-शंभर २९ हिंदीत-कारण ३१.माराची खूण ३४.सोने ३५.नुतन ३६. का□कर्त्यांचे संमेलन ३७.दिवाळीत बनवला जाणारा कुरकुरीत पदार्थ ३९.वेस ४०.एक जंगली पशू ४१.शंभर टक्के खरे, एखाद्या गोष्टीची खातरजमा करण्यासाठी वापरतात तो शब्द ४३.व्यवस्थित ४५.उरलेले, विद्वान ४७.घाण,हिणकस,किड ४८.इंग्रजीत-□णे ५०.सागरात मिळणा□ा एका विशिष्ट प्रकारच्या जीवाचे कवच वा त्याचे केलेले वाद्य ५१.धडक ५२.सुरक्षित, सुरक्षितपणे ५३.समुद्र **उभे शब्द :** १.तुफान २.भाकरी भाजण्यासाठी वापरतात ३.पदधतशीरपणे ४.पतीचे घर ५.सम□ ७.नोकरी १०.मुलाची मुलगी ११.इच्छा १३.घोळका १४.एक फळभाजी १५.जास्त-विरुदध १७.समारोह १९.घरातील चिल्लीपिल्ली, वंशावळ २१.आकाश २३.वा□ाच्या सहाय्याने वीज निर्मिती करणारे □त्र २४.सोबत २६.वाढ ३०.प्रभु रामचंद्र □ांची पत्नी सीतेचे पिता ३२.मनासारखे वागणे ३३.कासवांच्या उत्पत्तीसाठी प्रसिद्ध असलेला एक दिवेआगर □थील सागरी किनारा ३६.उत्तर प्रदेशातील एक शहर ३८ भगवंताने केलेले चमत्कार ४१.नाश पावणे ४२.आळशी पक्षी म्हणून ओळखला जाणारा एक पक्षी ४४.गंजा ४५.डोंगर माथा ४६.फेरा,घेरी ४९.मज ५१.नजर

शब्दकोडे क्रमांक.२०९० चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | यो | ध्या | | मो | □ | क | | क | मा | व | ता |
| म | ग | न | ला | ल | | प | ड | व | ळ | | री |
| न | | स्थ | ल | | बा | | र | ड | | न | ख |
| | म | | न | र | ब | ळी | | सा | ह | स | |
| र | य | त | | ह | र | | ता | | ग | ल | का |
| वा | त | | कां | स्य | | भ | र | धा | व | | ठ |
| ळ | | मा | □ | | स | र | | म | ण | का | |
| | ना | न | | का | पा | | स | ण | | र | म |
| न | | व | जी | र | | ढा | ल | | चा | कू | |
| स | म | ता | | खा | र | का | | सा | | न | थ |
| बं | ध | | म | ना | ई | | च | | व | | रा |
| □ | | रा | ठ | | स | व | ल | त | | धा | र |









# मनपाच्या इंग्लिश मीडियम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न


**धुळे, दि.१६- शहरातील मनपा शाळा क्र.९ येथील इंग्लिश मीडियम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन आ.अनुप अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.**

याप्रसंगी बोलतांना आ.अग्रवाल म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून इंग्रजी माध्यम शाळा महापालिकेच्या वतीने चालू करण्यात आली आहे परंतु महापालिका वतीने या शाळेला कोणतेही अनुदान नाही तसेच शिक्षकांना वेळेवर पगार दिला जात नाही. परंतु तरी गोरगरिबांच्या मुलांना शिक्षकांकडून चांगल्या प्रकारे शिक्षण दिले जाते. म्हणून शासकीय स्तरावर पाठपुरावा करून शाळेला मान्यता देण्याचे काम मी करणार आहे. तसेच शिक्षकांना वेळोवेळी पगार देण्यासाठीही मी महापालिकेकडे प्रयत्न करणार आहे. लवकरात लवकर इंग्रजी माध्यमाच्या शाळा डिजिटल करू. याप्रसंगी भाजप महिला मोर्चाचे मायाताई परदेशी, मनसेचे युवा अध्यक्ष हर्षल परदेशी, महापालिक शाळेचे प्रमुख छाया करनकाळ, मनिषा गांगुर्डे, नेहा जोशी, तेजल चौधरी, राखी काळे, स्नेहा जगदाळे, श्रद्धा शिंदे, रुकैय्या अन्सारी, पल्लवी मराठे, माधुरी कोळपे, तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी पालक कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोहिदे त.श.येथे युनियन बँकेच्या नविन शाखेचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन; ग्रामस्थांच्या मागणीला यश

**शहादा, दि.१६ (प्रतिनिधी)- तालुक्यातील मोहिदे त.श.येथे राष्ट्रीयीकृत युनियन बँक ऑफ इंडियाची नविन शाखेचे उद्घाटन महा. प्रबंधक नवीन जैन अंचल प्रमुख पुणे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी आयएएस कृष्णकांत कनोरीया, क्षेत्र प्रमुख प्रभात कुमार क्षेत्रीय कार्यालय नाशिक विभाग, मोहिदे शाखेचेशाखाप्रबंधकविजयानंद बलेवार, सहायक व्यवस्थापक नकुल कोराडे, कॅशियर संकेत गवई, शहादा शाखेचे प्रबंधक मयूर पाटील, मोहिदे गावाचे सरपंच सौ.श्रध्दाताई पाटील, उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य, सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.**

प्रथम दीप प्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते युनियन बँक नविन शाखेचे उद्घाटन नवीन जैन महा प्रबंधक अंचल कार्यालय



पुणे, प्रभात कुमार क्षेत्र प्रमुख क्षेत्रीय कार्यालय नाशिक यांचे हस्ते करण्यात आले. तसेच त्यांच्यासह प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत शाखेच्या नवीन इमारतीच्या वास्तु प्रवेश रिबीन कापून करण्यात आला. बऱ्याच वर्षापासून राष्ट्रीयकृत बँकेची शाखा व्हावी म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रकाश गिरासे व परिसरातील ग्रामस्थांनी वेळोवेळी मागणी केली होती. अखेर मागणी पूर्ण झाल्याने आज आनंदाचा दिवस उगवला अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते भाऊभाई पाटील, उपसरपंच ललिता पाटील, ग्रा. पं.सदस्या रतका गिरासे, श्रीमती सुशिला पाटील, पुरुषोत्तम पाटील, प्रकाश गिरासे, रमेश जैन, योगेश पाटील यांचे सह ज्येष्ठ नागरिक, महिला बचत गट व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नंतर प्रमुख पाहुण्यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी नवीन जैन व प्रभात कुमार यांनी उपस्थितांना बँकेचे कामकाज, कार्य तसेच उपयोगीता याबाबत सखोल मार्गदर्शन केले. तसेच ठेवीदार व कर्जदार यांना बँकेपासून मिळणाऱ्या सेवा याबाबतही मार्गदर्शन केले. यावेळी नवीन जैन व प्रभात कुमार यांच्या हस्ते सती माता महिला बचत गट मोहिदे, शाकंबरी महिला बचत गट मोहिदे, देवेंद्र प्रमोद जाधव, लताबाई भाऊ पाटील, सविता बाबूलाल पाटील यांचे कर्जप्रकरणे स्विकारण्यात आलीत. याचवेळी गावातील काही ठेवीदारांनी बँकेत ठेवी ठेवण्याचे आश्वासित केले.

यावेळी शहादा शाखा प्रबंधक मयूर पाटील यांनी प्रास्ताविक मध्ये बँकेविषयी माहिती दिली. या कार्यक्रमास परिसरातील सोनवद, कवठळ, कहाटूळ येथील ही ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मयूर पाटील यांनी तर आभार विजयानंद बिलेवार यांनी मानले. तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी शहादा शाखेचे व्यवस्थापक सागर केदार, कृषी अधिकारी प्रणय काळे, सहा.व्यवस्थापक धनंजय बधान, शिपाई आनंदा कोळी व घरमालक योगेश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ब्राम्हणपूरी येथे कार्यशाळेत नवीन फौजदारी कायदेविषयक जनजागृती

**शहादा, दि.१६ (प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्हा पोलीस दलामार्फत शंभर दिवसांच्या कार्यक्रमात नवीन फौजदारी कायदेविषयक जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक गावात जाऊन पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांच्या मार्गदर्शनाखाली शहादा पोलीस स्टेशन अंतर्गत शहादा तालुक्यातील ब्राह्मणपुरी येथील श्रीमती सरीबेन इंदास तात्या पाटील माध्यमिक विद्यालयात नवीन कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात आले.**




या कार्यक्रमासाठी शहादा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निलेश देसले यांनी ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यात भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३, तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच भारतीय साक्ष अधिनियम या नवीन कायद्याची माहिती देण्यात आली. यात नवीन कायद्यासह सायबर व इतर गुन्ह्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांच्या संकल्पनेतून तरुणांना प्रशिक्षण व रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी एका स्वयंसेवी संस्थेकडून ४५ दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम मोफत आयोजित केला जात आहे. अभ्यासक्रम पूर्णपणे निवासी आणि मोफत आहे. उमेदवारांची वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे असून किमान उत्तीर्ण असावा, जास्तीत जास्त तरुणांनी रजिस्ट्रेशन फॉर्म भरून निशुल्क प्रशिक्षण योजनेत सहभाग घ्यावा असे आवाहन शहादा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निलेश देसले यांनी केले. त्याचप्रमाणे दैनंदिन घडणारे सायबर गुन्ह्याबाबत काय खबरदारी घ्यावी. सायबर कायदा, सायबर दक्षता गुन्ह्याची माहिती देत सायबर गुन्हा कशा पद्धतीने घडू शकतो इंटरनेट कशा पद्धतीने हाताळावे याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अरुण पाटील, डॉ.अजित पाटील, सुदाम पाटील, राजाराम पाटील, अंबालाल पाटील, लक्ष्मीकांत पाटील, राजेंद्र पाटील, अशोक पाटील, सुभाष पाटील, रणजीत राजपूत, अरविंद कापडे, दिनकर मराठे, सुनील गिरासे, पोलीस पाटील रवींद्र पवार, ब्राह्मणपुरी बीटचे हवालदार युवराज पाटील, गोपनीय शाखेचे किरण सूर्यवंशी, प्रवीण पाडवी, योगिता पटेल, भावना पाटील व ग्रामस्थ विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रवीण भिलावे यांनी तर आभार दिलीप साळवे यांनी मानले.



# आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या संशोधन विद्यार्थ्यांचे आविष्कार स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन

**शिरपूर, दि.१६- आर.सी. पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या संशोधन विद्यार्थ्यांनी यंदाच्या 'आविष्कार २०२४-२५' स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आयोजित या राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेत महाविद्यालयाच्या ११ संशोधन प्रकल्पांची निवड झाली. या उल्लेखनीय यशाने संस्थेच्या संशोधन परंपरेला अधिक बळकटी दिली.**

प्रथम टप्पा जिल्हास्तरीय अविष्कार ५ डिसेंबर २०२४ रोजी विद्या विकास मंडळाचे सी.गो. पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, साक्री येथे पार पडली. या फेरीत आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध शाखांमधून मानव्य विद्या भाषा आणि ललित कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा, कृषी आणि पशुपालन, औषध आणि औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, तसेच शुद्ध विज्ञान आपल्या संशोधन प्रकल्पांचे प्रभावी सादरीकरण केले. एकूण प्रकल्पांपैकी विद्यापीठस्तरावर ११ उत्कृष्ट संशोधन प्रकल्पांची राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेसाठी निवड झाली.

पदव्युत्तर स्तरावर कृषी आणि पशुपालन विभागातील लीना शिंपी व दीक्षिता जैन यांनी द्वितीय पारितोषिक पटकावले. औषध आणि औषधनिर्माणशास्त्र विभागातील संस्कृती सरकार व तेजल आठरे यांनी प्रथम, प्रणाली पगार व अर्चना वाडिले यांनी द्वितीय, तसेच मोहिनी तायडे यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विभागातून राजेश्वरी माळोदे व कोमल ढोरे यांनी मॉडेल प्रेसेंटेशनमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. शुद्ध विज्ञान विभागातून संकेत निकुंभ व सौरभ अमृतकर यांनी प्रथम पारितोषिक मिळवले. मानव्य विद्या भाषा आणि ललित कला विभागात लीना संजय पाटील व प्राजक्ता बिदवे यांनी तृतीय, उर्मिला निकम व नफीस शेख यांनी द्वितीय पारितोषिक पटकावले.

पीपीजी स्तरावर औषध आणि औषधनिर्माणशास्त्र विभागातील सुमित राठोड यांनी प्रथम क्रमांक मिळवला. संशोधन सादरीकरणाच्या तयारीसाठी महाविद्यालयीन समिती प्रमुख डॉ. शैलेश एस. चालिकवार आणि समिती सदस्य डॉ. सुरज चौधरी, प्रा. नकुल कथार, प्रा. प्रीतम पावार, प्रा. अक्षय संकलेचा, प्रा. दुर्गेश्वरी कलाल आणि डॉ. मीना तिलावत यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.शिरपूर एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटे, सचिव सौ. रेशा पटेल, सर्व संचालक, प्राचार्य डॉ. संजय सुराणा, प्राचार्य डॉ. नितीन हासवानी, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विजेत्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील राज्यस्तरीय फेरीसाठी शुभेच्छा दिल्या. या उल्लेखनीय यशाने आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयाने संशोधनाच्या क्षेत्रात आपली पताका आणखी उंचावली आहे.

## डॉ.आकाश पाटील राष्ट्रीय पात्रता परिक्षेत यशस्वी



धुळे, दि.१६- डॉ.आकाश चंद्रशेखर पाटील यांनी भारतातील राष्ट्रीय पात्रता परीक्षेत (एफ.एम.जी.इ.) पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश मिळविले आहे. डॉ.आकाश पाटील यांनी विदेशातून एमबीबीएस पदवी संपादित केली असून भारतातील राष्ट्रीय पात्रता परीक्षेत ३०० पैकी २२४ गुण प्राप्त करून यश संपादन केले आहे. डॉ.पाटील हे सायने (ता. धुळे) येथील आदर्श शिक्षक स्व.आत्माराम देवराम पाटील यांचे नातू व नवनगर येथील प्रा.चंद्रशेखर पाटील, सौ.छाया पाटील यांचे सुपुत्र आहेत. डॉ.पाटील यांच्या यशाबद्दल माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील यांनी सत्कार करून अभिनंदन केले आहे.

## बायोटेक्नोलॉजी परिषदेत पृथ्वी करंदेचा सहभाग



धुळे, दि.१६- जर्मनीमधील सुटगार्डजवळील फोरजीम सिटी येथे दि.१० ते २० जाने. २०२५ या कालावधीत झालेल्या आंतरराष्ट्रीय बायोटेक्नॉलॉली परिषदेत धुळ्यातील लेखक आप्पा करंदे यांची कन्या पृथ्वी करंदे हिने सहभागी होवून प्रमाणपत्र प्राप्त केले. पुणे येथील मॉर्डन सायन्स कॉलेजमध्ये पृथ्वी एम.एस्सीच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. तिचे शालेय शिक्षण आर.के.चितळे माध्यमिक विद्यालय येथे झाले आहे. जर्मनीतील इंटरनॅशनल बायोटेक्नॉलॉजी सेमिनारसाठी जगातील पंचवीस देशातील शंभर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यात पृथ्वी करंदे हिने शैक्षणिक क्षेत्रात आपल्या बुध्दीमत्तेचा झेंडा फडकवल्याने सर्व स्तरातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# यंदाचे भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन अलिबाग महाविद्यालयात होणार!

**धुळे, दि.१६- का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे आणि आय.क्यू.एसी भाषा व सामाजिक शास्त्र विभाग जे.एस.एम. महाविद्यालय, अलिबाग, जि.रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित केले आहे.**

यानिमित्ताने प्राच्यविद्या पंडित शरद पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न होणार आहे. या राष्ट्रीय चर्चासत्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इतिहास विषयाचे निवृत्त प्राध्यापक डॉ.उमेश बगाडे बीजभाषण करतील. याप्रसंगी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड.गौतमभाई पाटील उद्घाटन सत्राचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध आदिवासी लेखिका नजूबाई गावीत उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे अध्यक्ष डॉ.यशवंत मनोहर, का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानाचे अध्यक्ष शशिकांत धामणे, का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेचे अध्यक्ष डॉ. के.बी. पाटील, संस्थेच्या संचालक डॉ.वंदना महाजन उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनाचा समारोप समारंभ जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली येथील राज्यशास्त्र विषयाचे निवृत्त प्राध्यापक डॉ.गोपालगुरू यांच्या अध्यक्षतेखाली तसेच का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठानच्या सचिव प्रा.डॉ.शोभा शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. 'माफुआ ते सौत्रांतिक मार्क्सवाद', 'जात, वर्ण, वर्ग, स्त्रीदास्यांतक भूमिका', 'शरद पाटील यांची सौंदर्यशास्त्रविषयक भूमिका', 'शरद पाटील तत्व आणि व्यवहार' या विषयांवर चर्चा होणार आहे. या चर्चेमध्ये भारत पाटणकर, सुरेंद्र जोंधळे, सुधाकर गायकवाड, लता प्रतिभा मधुकर, किशोर ढमाले, संध्या नरे-पवार, श्रीनिवास हेमाडे, देवेंद्र इंगळे, दिलीप चव्हाण, राहुल कोसंबी, अनिल सपकाळ, सचिन गरूड, राजेंद्र गोणारकर, संजयकुमार कांबळे, धम्मसंगिनी रमा गोरख, मृदुल निळे, नारायण भोसले, मीनल जगताप हे अभ्यासक सहभागी होणार असून चर्चक म्हणून देवकुमार अहिरे, विनोद कुमरे, ललित पाटील, अश्विनी तोरणे, सुनील वाघमारे हे सहभागी होणार आहेत. या चर्चासत्रात खुल्या सत्राचे आयोजन करण्यात आलेले असून चर्चासत्रासाठी वाचले जाणारे निबंध का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेचे मुखपत्र असलेल्या 'आमची श्रीवाणी' या नियतकालिकात प्रसिद्ध केले जाणार आहेत. चर्चासत्रात अभ्यासकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. वंदना महाजन, प्राचार्या सोनाली पाटील, डॉ.आय.पी. कोकणे, डॉ. नीळकंठ शेरे यांनी केले आहे.



धुळे- थोर समाजसुधारक, बंजारा समाजाचे आद्य गुरू संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नायब तहसिलदार (सामान्य) गोपाळ पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सहाय्यक महसूल अधिकारी विजय बावा यांचेसह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था तसेच सर्व संबंधिताना, जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे पुरमेपाडा (५२६६०६) पो. तु. ता. धुळे तु. जि. धुळे पैकी जि. प. धुळे येथील ता. प. स. धुळे गट नं. १९८/१/अ जिरायती शेतजमीन, ही शेताचे स्थानीक नाव सडकेचा भोगवटादार वर्ग-१, मधील असून त्यासी क्षेत्र: लागवडी लायक १ हेक्टर १६ आर, यासी आकार १ रु. ६० पैसे यासी चुत:सिमा गाव नकाशाप्रमाणे.

सदर वर नमूद मिळकत ही १) **दिनेश गोविंद पाटील** रा. होळी चौक, मु. पो. आर्वी ता. जि. धुळे, २) **संजय लोटन पाटील** रा. उडाणे ता. जि. धुळे वगैरे १९ यांची होती व आहे. त्यांची सर्वांची नावे ही ड-पत्रक क्र. १२५५, २११४ व २१२० अन्वये लागलेले असून, सामाईक क्षेत्र असून सदर मिळकती ही आमचे पक्षकार ह्यांचे सोबत कायम विक्री कामी सौदा पावती ही केलेली असून, बयाणा पोटी रक्कमेचा स्विकार केलेला आहे.

सबब वर नमूद मिकतीवर कोणचाही, कोणत्याही प्रकारची मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा, हक्क असल्यास किंवा संकल्पीत व्यवहारास कोणत्याची प्रकारचे हरकत वा विरोध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत त्याबद्दल स्वत:च्या हक्काच्या सत्यप्रतिसह आम्हास खालील पत्त्यावर लेखी कळवावे. नियोजित मुदतीत कोणचीही, कोणतीही तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निर्बोज असल्याचे समजण्यात येवून, सदरील मिळकतीचे खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल या नंतर कोणीही काहीही तक्रार वा हक्क दाखविल्यास तो आमच्या पक्षकारांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, तसेच सदर मिळकती बाबत आलेल्या परस्पर हरकतींचा विचार केला जाणार नाही. तर हकरती असल्यास खालील नमूद पत्त्यावर पुराव्याच्या कागदपत्रांच्या प्रतिसह पाठवण्यात याव्यात.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरून त्यांचे तर्फे आमचे मार्फत दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे, ता. १५/०२/२०२५

**ॲड.सर्वोत्तम एस. कुलकर्णी** मो.नं. ९३२५१८२६५३

१८ दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, जिल्हा न्यायालय समोर, ता. जि. धुळे



## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस व जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व संबंधितांना तसेच सर्व बँका, पतपेढ्या, तथा इतर सर्व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : तु. तु. जिल्हा धुळे, पो. तु. ता. धुळे पैकी जिल्हा परिषद धुळे व तालुका पंचायत समिती धुळे तथा धुळे म. न. पा. हद्दीमधील मौजे वलवाडी येथील स.नं. १६/३ पैकी प्लॉट क्र. ३६ चे क्षेत्र १६५.०० चौ. मी. बखळ प्लॉट यांसी चतु:सिमा मंजूर ले आऊट प्रमाणे.

वर नमूद वर्णनाचा बखळ प्लॉट हा सौ. पारुल किशोर देसले रा. पुणे यांच्या मालकीचा व ताबेउपभोगातील असून महसूल दप्तरी ७/१२ उताऱ्यावर मालक कब्जेदार सदरी त्यांचे नाव लागलेले आहे.

सदर मिळकत आमच्या पक्षकारांनी वर नमूद मिळकत धारकाकडून खरेदी करणेबाबत सौदा केलेला असून सदर सौद्या अंतर्गत बयाणा रक्कम देखील अदा केलेली आहे. तसेच सदर मिळकतीचे खरेदीखत आमचे पक्षकार लवकरच दुय्यम निबंधक धुळे यांच्या कार्यालयात वर नमूद मिळकत धारकाकडून लिहून व नोंदवून घेणार आहेत.

सबब सदर मिळकतीवर ज्या काही व्यक्ती/संस्था यांचा कोणताही हक्क, लाभ, अधिकार, दावा, मागणी, हितसंबंध, तसेच विक्री, अदलाबदल, भाडे, भाडेपट्टा, वहिवाट, परवाना, अभिहस्तांकन, गहाण, वारसाहक्क, परंपरा, मृत्यूपत्र, गंभीर करार, कौटुंबिक तजवीज, हिंदु अन डिव्हायडेड फॅमिली, प्रतिपाळ, जप्ती, आरक्षण, किंवा कोणतेही दायित्व किंवा बांधिलकी, अत्यंदान, उत्तराधिकार, बक्षीस, धारणाधिकार, प्रभार, निर्वाह, सुविधाधिकार, विश्वस्त कब्जा, ताबा, तसेच कोणताही दावा, न्यायालयीन आदेश/हुकूमनामा, कंत्राट/करार, विकासननामा, देवाण-घेवाण, बेचेन-पत्र, कर्ज फिटेपर्यंत मिळकत ताब्यात ठेवण्याचा हक्क, हितभाग आणि /अथवा स्वारस्य असेलेले पतदार, आणि/ अथवा लेंडर, तसेच समाविष्ट असलेले किंवा नसलेल्या व्यक्तींची संस्था, किंवा व्यक्तींची असोसिएशन,वित्तीय संस्था/वित्तीय बँका, कंपनी,स्वतंत्र व्यक्तीचा समावेश असलेल्या सर्व व्यक्तींनी त्यांचा ज्या कोणत्याही प्रकारचा हक्क असेल तो किंवा ज्या कोणत्याही मागणीच्या स्वरुपातील वर नमूद मिळकत किंवा वर नमूद मिळकतींचा कोणताही भाग किंवा त्याच्या हिश्यासंबंधी कोणताही आक्षेप असल्यास कृपया लेखी स्वरुपात पृष्टयर्थ मूळ कागदपत्रांसोबत निम्मलिखित स्वाक्षरीकारांकडे त्यांच्या खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत आक्षेप/हरकती नोंदवाव्यात.

सदर मुदतीत कोणाचीही आक्षेप/हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध व बोजा विरहीत आहे असे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिद्ध केलेल्या तसेच कागदपत्रांशिवाय आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन तसेच दाखवलेल्या कागदपत्रांवरुन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

कळावे. ही जाहीर नोटीस. धुळे, दि. १५/०२/२०२५

**ॲड.विशाल शरद भट** मो. नं. ९३२६१९८१७९

कार्यालय : ३८, जानकी नगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.


## धुळे जिल्ह्यातील "ब" वर्गातील सहकारी संस्थांच्या व्यवस्थापक समितीचा पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रम
## सन २०२३ ते २०२८ करीता मतदार यादीचा कार्यक्रम (फक्त सभासदांकरिता)

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६ व ११ मधील तरतुदीनुसार खाली नमूद संस्थांचा प्रारूप मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

**धुळे तालुका-** १) प्रियदर्शनी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.शिरपूर, ता.शिरपूर, जि.धुळे.

| अ. क्र. | तालुका | तपशिल | प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करणे दिनांक व वेळ | प्रारूम मतदार यादीवर हरकती स्वीकारणे अंमित दिनांक व वेळ | आलेल्या हरकतीवर निर्णय देणेसाठी सुनावणी दिनांक व वेळ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थळ | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे व संबंधीत तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धुळे/शिरपूर/शिंदखेडा, जि.धुळे यांचे व संस्थेचे कार्यालय | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे कार्यालय | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे कार्यालय | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे व संबंधीत तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा उप/सहाय्यक निबंधक, सहकारी कार्यालय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | धुळे | उक्त नमूद संस्था | १७/२/२०२५ कार्यालयीन वेळेत | १७/०२/२०२५ ते २७/०२/२०२५ कार्यालयीन वेळेत | ०३/०३/२०२५ सकाळी ११.०० वाजता<br>सुनवणीवर निर्णय घेणे अंतिम दिनांक १०/०३/२०२५ पर्यंत | १) हरकती/सूचना प्राप्त झाल्यास दिनांक १३/०३/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेत अथवा २) कोणतीही हरकत/सूचना प्राप्त नसल्यास दिनांक २८/०२/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेत प्रारूप मतदार यादी हिच अंतिम मतदार यादी म्हणून प्रसिध्द करण्यात येईल. |

दाखल करावयाची हरकत/सूचना ही लेखी अर्जाद्वारे व पुराव्यानिशी करणे अनिवार्य राहील. संस्थेच्या सभासदास प्रारूप मतदार यादीवर हरकती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे कार्यालयात दाखल करता येईल. हरकतदारास सुनावणीची नोटीस स्वतंत्रपणे निर्गमीत करण्यात येणार नसल्यामुळे उपरोक्त नमूद सुनावणीच्या दिनांकास व वेळेत हरकतदाराने समक्ष उपस्थित राहणे अनिवार्य आहे व ती हरकतदाराची वैयक्तीक जबाबदारी राहील. अन्यथा हरकतदाराच्या गैरहजैरीत योग्य तो निकाल केला जाईल.

प्रारूप मतदार यादी व अंतिम मतदार यादी ही मा.सहकारी आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाचे संकेतस्थळ http://sahakarayukta.maharashtra.gov.in येथे शक्यतोवर प्रसिध्द करण्यात येईल.

**स्थळ- धुळे**
**दिनांक- १२ फेब्रुवारी, २०२५**

(मनोज चौधरी)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ४९३/१/अ/ब/क/३ पैकी १) प्लॉट नं. ४९ चे क्षेत्र ६७.५० चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ४६, दक्षिणेस : प्लॉट नं. ४८, उत्तरेस : प्लॉट नं. ५०, २) प्लॉट नं. ५० चे क्षेत्र ६७.५० चौ. मी. यासी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ४५, दक्षिणेस : प्लॉट नं ४९, उत्तरेस : प्लॉट नं. ५१, येणे प्रमाणे वर्णनाचा बखळ प्लॉट मिळकती **सौ. गंगा विजय गोसावी**, रा. ११, समता नगर, शासकीय दुध डेअरी रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकती कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे आशिलांशी केला आहे.

आमचे आशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, सॉल्हन्सी, हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधी योग्य ते कागदपत्रानिशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध, असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दिनांक: १६/०२/२०२५

**ॲड.विजय म.मोरे**

नोटरी -भारत सरकार

रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे मो. नं. ९८२२८५२६५०.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी येथील धुळे म. न. पा. हद्दीतील स. नं. १२५/३ यातील प्लॉट नं. ४० चे एकूण क्षेत्र १५० चौ. मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा : पुर्वेस : प्लॉट नं. ४३, पश्चिमेस : रस्ता व वापर,दक्षिणेस : प्लॉट नं. ३९ व उत्तरेस : प्लॉट नं. ४१अ.

येणेप्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील बखळ प्लॉट हा श्री. हेमंत गोविंद पाटील रा. नंदुरबार, यांचे मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच मिळकत हक्क, हिस्सा, टांच, गहाण, बक्षिस, जप्ती, बोजा, पतपेढी, जनरल मुखत्यार हक्क, मृत्यूपत्र, सौदापावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कळवावी. मुदतीत हरकत अगर तक्रारी न आल्यास आमचे आशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमच्या आशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १६/०२/२०२५

**ॲड.प्रमोद मुकुंदा चौधरी**

११४, गोविंदा अपार्टमेंट देवपूर धुळे.

मो. ९८६०७०६१७१

पान १ वरुन

## रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरीत अठरा ठार

आपल्या हाती घेतली आहेत. या घटनेबाबत बोलताना केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील परिस्थिती आता नियंत्रणात आहे. दिल्ली पोलीस आणि आरपीएफ घटनास्थळी पोहोचले आहेत. जखमींना रुग्णालयात नेण्यात आले आहे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. पुढे एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये अश्विनी वैष्णव म्हणाले, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या दुर्दैवी चेंगराचेंगरीमुळे खूप दुःख झाले आहे. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे, आम्ही त्यांच्याबरोबर आहोत.

दरम्यान, या घटनेनंतर दिल्लीच्या काळजीवाहू मुख्यमंत्री अतिशी यांनीही दुःख व्यक्त केले आहे. एक्सवर पोस्ट करत त्या म्हणाल्या, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेगरीत महाकुंभमेळ्याला जाणाऱ्या भाविकांचा दुर्दैवी मृत्यू अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक आहे. मी एलएनजेपी रुग्णालयात पोहोचली असून पीडितांच्या कुटुंबीयांना भेटली आहे. यामध्ये अनेक लोक जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आमचे दोन आमदार पीडित कुटुंबांना मदत करण्यासाठी रुग्णालयात उपस्थित आहेत.

**पंतप्रधान मोदी दुःखी, मृतांना श्रद्धांजली**

या दुर्दैवी घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे. पंतप्रधानांसह संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही एक्सवर पोस्ट टाकत मृतांना श्रद्धांजली दिली आहे. पंतप्रधान मोदींनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील चेंगराचेंगरीच्या घटनेमुळे मी व्यथित झालो. ज्यांनी आपल्या कुटुंबियातील प्रियजनांना गमावले, त्यांच्याप्रती संवेदना व्यक्त करतो. जखमींच्या प्रकृतीमध्ये लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना करतो. चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेमुळे बाधित झालेल्या सर्वांना यंत्रणांकडून योग्य ती मदत दिली जाईल.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही या घटनेनंतर दुःख व्यक्त केले. एक्सवरील पोस्टमध्ये ते म्हणाले, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर घडलेली घटना भीषण होती. चेंगराचेंगरीच्या घटनेमुळी झालेल्या जीवितहानीमुळे मला अत्यंत दुःख झाले आहे. शोकाकुल कुटुंबियाप्रती संवेदना व्यक्त करतो. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होण्यासाठी प्रार्थना करतो.

## चार भाविक अपघातात ठार

अयोध्येला जात होती. अचानक बंद पडलेली खासगी बस समोर दिसताच चालकाने वाहनावरील नियंत्रण गमावले. मिनी बस ही खासगी बसला मागून जोरदार धडकली. हा अपघात एवढा भीषण होता की, मिनीबसच्या पुढील भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघातानंतर प्रवासी केबिनमध्ये अडकून राहिले. त्यांनी मदतीसाठी ओरडण्यास सुरुवात केली. त्यांचा आवाज ऐकून आजूबाजूच्या लोकांनी गर्दी केली. परिसरातील लोकांनी कळविल्यानंतर घटनास्थळी पोलिस पोहोचले.

## महाराष्ट्रात जीबीएसचा धोका वाढला

झाली आहे. दोन्ही संशयित रुग्ण पंढरपूर शहरातील असून, त्यांच्यावर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.पुणे, कराडमध्ये प्रत्येकी एका रुग्णावर उपचार सुरू आहेत. १५ दिवसांत ६ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत.

**नसांशी संबंधित एक गंभीर आजार**

महाराष्ट्रात गिलेन बॅरे सिंड्रोमचा कहर सतत वाढत आहे. जीबीएस हा नसांशी संबंधित एक गंभीर आजार आहे. जीबीएस विषाणूमुळे जीव गमावणा-यांची संख्या वाढत आहे. पुण्यात नुकत्याच झालेल्या मृत्यूनंतर या विषाणूने आता मुंबईत एका रुग्णाचा बळी घेतला आहे. मुंबईतील नायर रुग्णालयात व्हेंटिलेटरवर दाखल असलेल्या वर्षीय रुग्णाचा मृत्यू झाला. मुंबईत जीबीएस संसर्गामुळे झालेला हा पहिला मृत्यू आहे.

## आरोपीचा जामीन कोर्टाने नाकारला

त्याने मे.जिल्हा सत्र न्यायालयात जामिनीसाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जावर वेळोवेळी युक्तीवाद होऊन जिल्हा व सत्र न्यायमूर्ती श्री.भगदले यांनी सदरचा जामिन अर्ज फेटाळून लावला. सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील अजय एस.सानप यांनी बाजू मंडली. याकामी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळी हजर असलेले पोलीस कर्मचारी, त्याचप्रमाणे विविध पंचनामे, रासायनिक विश्लेषण इत्यादीचा आधार घेवून सदर जामीन अर्जास विरोध केला होता. सदरचा युक्तीवाद लक्षात घेत न्यायमूर्ती श्री.भगदले यांनी सदरचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

## आजपासून शिवचरित्र व्याख्यानमाला

प्रेमकुमार बोके. त्यांचा विषय आहे एकविसाव्या शतकात शिवचरित्राची प्रासंगिकता. तर दि.१९ फेब्रुवारी शिवजयंती दिनी संस्थेच्या सर्व शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनींचे विविध शिवकालीन प्रसंगाचे सादरीकरण संस्थेच्या डॉ. पा.रा.घोगरे वरीष्ठ महाविद्यालयांच्या प्रांगणात केले जाऊन शहरातून भव्य शोभायात्रा काढली जाईल. सायंकाळी अंतिम पुष्पाची गुंफन शिवव्याख्याते तुषार उमाळे करतील. छत्रपती शिवाजी महाराज आणि राष्ट्र या विषयावर ते बोलतील. व्याख्यानमालेस उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे चेअरमन कुणाल पाटील व सर्व पदाधिकारी, शाखाप्रमुख यांनी केले आहे. दररोज सायंकाळी ७ ते १० वाजेपर्यंत व्याख्यान होईल. सभास्थळी शिवकालीन प्रसंगांचे भव्य चित्र प्रदर्शन तीनही दिवस असणार आहे.

## ग्रामसभेतून होणार जलसेवकाची निवड

याप्रसंगी जलतज्ञ जल योद्धा रमाकांत बाप्पू, यशदाचे आनंद पुसवडे, वैभव भागवत, वाघाड प्रकल्पाचे अध्यक्ष राज्यातले जलसंधारण विभागाचे वरिष्ठ इंजिनियर इत्यादी उपस्थित होते. यशदाचे तज्ञ मार्गदर्शक जलप्रेमी वाल्मीक सोनवणे यांनी जल प्रतिज्ञा देऊन समारोप केला.

## रुग्णाची खासदारांकडून आस्थेने विचारपूस

आवश्यक ते उपचार तातडीने करण्याच्या योग्य त्या सूचना संबंधित डॉक्टरांना केल्या आहेत.दरम्यान हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कुत्रा चावल्याने उपचारार्थ सात वर्षीय बालिका देखील दाखल असल्याचे कळताच खासदार डॉ.बच्छाव यांनी संबंधित बालिकेची भेट घेत विचारपूस केली आहे. संबंधित बालिकेवर योग्य ते आवश्यक उपचार तात्काळ करण्यात यावेत अशा सूचना रुग्णालय प्रशासनास केल्या आहेत. खासदार डॉ.बच्छाव यांनी धुळे मनपा आरोग्य अधिकारी यांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करीत शहरातील मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याच्या सूचना केल्या आहेत. वारंवार सूचना करूनही महानगरपालिका प्रशासनाकडून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त होत नसल्याने खासदार डॉ.बच्छाव यांनी तीव्र नाराजी देखील व्यक्त केली आहे. दरम्यान जीबीएससह कोणत्याही अन्य आजारास प्रतिबंध करण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष सतर्कता बाळगीत जनजागृतीसह योग्य उपायोजना करण्याच्या देखील सूचना खासदार बच्छाव यांनी आरोग्य यंत्रणेस केल्या आहेत. व प्रत्येक नागरिकांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी यासाठी योग्य खबरदारी बाळगावी असे आवाहन देखील खासदार डॉ.शोभा बच्छाव यांनी केले आहे.

## लाडक्या बहिणींचे उत्पन्न

अधिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांना वगळण्याच्या हालचाली सुरू असल्याचं समजतंय. उत्पन्नाबाबतच्या माहितीसाठी आयकर विभागाची मदत घेतली जाणार आहे. लाडकी बहीण योजनेत न बसणाऱ्या पाच लाख अपात्र महिलांना महायुती सरकारने योजनेतून वगळले आहे. लाडकी बहीण योजनेत सहभागी होण्यासाठी पात्र नसलेल्या लाभार्थ्यांनीही या योजनेचा लाभ घेतला होता. आता सरकारने निकषांची चाळणी लावलीये. निकषांत न बसणाऱ्या महिलांना योजनेतून वगळण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी जाहीर केले. अडीच कोटी महिला लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी आहेत. त्यातल्या पाच लाख अपात्र महिलांना वगळले आहे.

# पाताळगंगा नदीकाठ स्वच्छतेसाठी युवक युवतींचा पुढाकार
# सकारात्मक कार्यपध्दतीमुळे गावकऱ्यांकडून कौतूकाची थाप



**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- नदी काठावरील मंदिर परिसर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी गेल्या आठ ते दहा दिवसांपासून तालुक्यातील नळवे येथील सुनंदा मगन नाईक या तरुणीने गावातील २५ मुलां मुलीं सह झाडे, झुडपे श्रमदानातून काढून नदीकाठ स्वच्छ करण्याचा मानस व्यक्त केला आहे. कुठल्याही प्रसिद्धीची अपेक्षा न करता हातात झाडू आणि कोयता, इळा घेऊन स्वच्छता करण्यासाठी गावातील युवक व युवती राबत असल्याने गावकऱ्यांकडून त्यांच्या सकारात्मक कार्याचे कौतूक होत आहे.**

नंदुरबार तालुक्यातील नळवे येथील गावातून पाताळगंगा नदी वाहते, या नदी परिसरात मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता आहे. लगतच मंदिर देखील आहे. त्यामुळे या ठिकाणी स्वच्छता करणे गरजेचे असल्याचे समजल्यानंतर चार-पाच जणांनी झाडे झुडपे तोडण्यास सुरुवात केली. त्यात आणखीन काही युवक युवती सहभागी झाले .वीस ते पंचवीस युवक युवती मिळून परिसर स्वच्छ करण्याचे काम सुरू झाले आहे. सुनंदा नाईक ही युवती महेंद्र पब्लिक स्कूलच्या संचालिका पिनल शहा यांच्याकडे कामाला आहे तिच्यासोबत त्याच ठिकाणी कामाला असलेली नंदिनी गिनू वळवी ही देखील मदत करत असते. सुनंदा नाईक ही नळवे येथून कामासाठी नंदुरबार शहरात येत असते दिवसभर काम करून ती सायंकाळी पाच ते आठ वाजेपर्यंत अन्य जणांना सोबत घेत परिसर स्वच्छ करत असते यात शाळेत जाणारे मुलं तसेच कामाला जाणारे युवक हे सहभागी होतात व श्रमदान करत असतात. सगळ्यांच्या हातभार लागल्याने परिसर स्वच्छ व सुंदर दिसू लागला. नदी परिसर स्वच्छ केल्यानंतर दुसऱ्या काठावरील परिसर स्वच्छ करण्यासाठी ग्रामपंचायतीचे सरपंच सरुबाई रोशन नाईक यांनी जेसीबी लावून परिसर स्वच्छ करण्याचे आश्वासन दिले आहे तसेच नदीकाठावर संरक्षक भिंत देखील बनविण्यात येणार आहे.

सुनंदा नाईक,नंदिनी वळवी,जितू पाडवी, आतिश नाईक, धरमदास वळवी, मंगलेश नाईक, कमलेश नाईक, कविता नाईक, सोनाली वळवी, मोनाली वळवी, सागर वळवी, भुऱ्या ठाकरे, महेंद्र नाईक, हितेश ठाकरे यांच्यासह आणखीन काही युवकांनी श्रमदान केले आहे. अशा पद्धतीने श्रमदान च्या माध्यमातून गावाचा स्वच्छता तसेच नदी संवर्धन करण्याच्या तसेच मंदिर परिसर स्वच्छ करण्याच्या आमचा हा प्रयतक सिहोर येथील प्रदीप मिश्रा महाराज यांच्या प्रेरणेने हा परिसर स्वच्छ केला असे सुनंदा नाईक यांनी सांगितले.

पान १ वरुन

## वाचन संस्कृती वाढविण्यासाठी शासनाचे सहकार्य

अधिक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. आज साहित्यिकांची संख्या हळूहळू कमी होत आहे. आपण नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे वाचन संस्कृती रुजवून चांगले कवी, लेखक, विचारवंत, साहित्यिक, विचारवंत निर्माण करण्याची गरज असल्याचे पालकमंत्री रावल यांनी सांगितले. यानंतर पालकमंत्री जयकुमार रावल यांनी पुस्तक प्रदर्शनाला भेट दिली.

या दोन दिवशीय ग्रंथोत्सवात काल परिसंवाद कार्यक्रमांत ग्रंथानी मला घडविले या विषयावर विद्यार्थ्यांना निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे यांनी मार्गदर्शन केले. आज झालेल्या परिसंवाद कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक डॉ.संजीव गिरासे, साहित्य समिक्षक डॉ.फुला बागुल, प्राध्यापक डॉ.रमेश माने यांनी खान्देशातील अहिराणी साहित्याची वाटचाल या विषयावर उपस्थित श्रोत्यांना सखोल मार्गदर्शन केले. कथाकथन कार्यक्रमात साहित्यिक सुरेश मोरे यांनी शेतकरी आत्महत्या या विषयांवर यसा दादानी फाशी लीदी यावर कथाकथन केले. तर अहिराणी कथाकार प्रविण माळी यांनी आयतं पोयतं सख्यांन हे एकपात्री नाटक सादर करुन प्रेक्षकांना हसवुन मंत्रमुग्ध केले.

बहुभाषिक कवी संमेलनात प्रभाकर शेळके, रावसाहेब कुवर, अरुणकुमार जव्हेरी, लतिका चौधरी, के.बी.लोहार, बाळु श्रीराम, प्रविण पवार, चंद्रशेखर कासार, प्रा.एन.डी.पाटील, माया साळुंखे, दत्तात्रय कल्याणकर, कमलेश शिंदे, गुलाब मोरे, अरविंद भामरे, शामल पाटील, सुनिल पाटील, गोकुळ बागुल, यशवंत निकवाडे, ईश्वर परदेशी, दत्तात्रय वाघ, जयराम मोरे, अहमद शेख, संजय धनगड, पौर्णिमा पाठक या कवीनी सहभाग घेतला. कवी संमेलनांनी उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सुत्रसंचलन ज्ञानेश्वर भामरे यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हा ग्रंथालय अधिकारी जगदिश पाटील यांनी केले.

## सर्वसंमतीने ठरवून दिलेले उमेदवार विजयी

अरुण माणिक मोरे, महिला प्रतिनिधी दोन जागांसाठी सावित्रीबाई अनंत पटेल व सखुबाई शालिग्राम वाघ तसेच इतर मागासवर्गीय एका जागेसाठी श्यामकांत विठ्ठल गुजर, भटक्या विमुक्त जाती जमाती व विशेष मागासवर्ग प्रवर्गासाठी च्या एका जागेसाठी भटू भिका धनगर यांची बिनविरोध निवड झाली.

उरलेल्या आठ जागांसाठी दहा उमेदवारी अर्ज असल्यामुळे निवडणुकीसाठी आज मतदान घेण्यात आले. निवडणूक अधिकारी नितेश महाले, सहकारी अमोल येडाईत, नवनीत गोसावी, सुनील मोगरे, भिकन मोहिते, रवींद्र चौधरी, संदीप विधाते, योगेश पाटील, ज्ञानेश्वर सांगळे यांच्या उपस्थितीत येथील मराठी शाळा नं.सहा या ठिकाणी दोन बूथद्वारे सकाळी ९ ते दुपारी ४ या काळात पोलीस बंदोबस्तात मतदान संपन्न झाले. मतदानानंतर लगेच निवडणूक निकाल जाहीर करण्यात आला. यात पांडुरंग ओंकार गुजर, शांताराम सखाराम चौधरी, स्वप्निल चंद्रकांत जैन, श्याम रघुनाथ देशमुख, प्रकाश कन्हैयालाल परदेशी, परशुराम भिला पाटील, रवींद्र तोताराम बडगुजर, रमेश शंकर माळी ह्या आठ उमेदवारांना विजय घोषित करण्यात आले. यावेळी माजी प.स.सदस्य अविनाश महाजन, जि.सदस्य प्रतिनिधी ज्ञानेश्वर चौधरी, राजेंद्र महाजन, आर.के माळी, केदारेश्वर मोरे, गोरख पाटील, माजी उपसरपंच प्रकाश गुजर, सोसायटीची माजी चेअरमन अशोक माळी, नंदू धनगर, प्रेमल पटेल, अनिल माळी, अरुण बडगुजर आदी उपस्थित होते.

## अनुदान प्रस्तावासाठी बावीसपर्यंत मुदत

वर्षासाठी अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व दिव्यांग शाळा यांनी आपले प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांचेकडे २२ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत सादर करावे. या दिनांकानंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत, असेही छ. रा. कनगरे, सदस्य सचिव, उच्चस्तरीय निवड समिती तथा जिल्हा नियोजन अधिकारी, धुळे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## नंदुरबारमध्ये पुढाऱ्यांचा आपापल्या पक्षवाढीवर भर

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ अभिजित मोरे यांनाही सदस्य नोंदणी मोहीम राबविण्याचे निर्देश वरीष्ठ पातळीवरुन प्राप्त झाल्याने त्यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मजबूतीवर भर दिला आहे. पालकमंत्री माणिकराव कोकाटे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असल्याने राष्ट्रवादीची ताकद वाढली आहे.तसेच खाते न उघडताही जिल्हा नियोजन समितीच्या तिजोरीच्या चाव्या आपल्या नेत्याच्या हातात असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातही दोन्ही पक्षाएवढेच चैतन्य आहे.

राज्यात भाजपा,सेना व राष्ट्रवादीची युती आहे. नंदुरबार जिल्हयात मात्र युतीतल्या घटक पक्षातील नेत्यामध्ये मतभेद आहेत. पालिका व जि.प. निवडणूकीत कशी रणनिती आखणार, यावर सद्या सर्वांनी चुप्पी साधली आहे. त्या त्या परीस्थितीनुसार निर्णय घेतले जाणार आहेत. सध्या भाजपा, सेना व राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांनी पक्ष मजबूतीसाठी पाऊले उचलली असून त्यासंदर्भात सदस्य नोंदणीवर भर दिला जात आहे.

**पाहिजेत**

दुकानाकरिता हेल्पर, सेल्समन, अकौन्ट करिता मुले व मुली पाहिजेत तसेच फोर व्हीलरसाठी ड्रायव्हर पाहिजे.
श्रद्धा इलेक्ट्रीकल्स्
पाच कंदिल, आग्रारोड, धुळे
7721029982
9421531897

**शेती विकणे आहे**

मोघण शिवारातील ३ एकर बागायती शेती योग्य दरात विकणे आहे
-: संपर्क :-
9420851253



# खान्देश माळी महासंघातर्फे वधु-वर परिचय मेळावा

**धुळे, दि.१६- खान्देश माळी महासंघ धुळे जिल्हा आयोजित सर्व शाखीय राज्यस्तरीय माळी समाज वधु वर परिचय मेळावा राजश्री शाहू महाराज नाट्य मंदिरात संपन्न झाला.**

खानदेश माळी महासंघ धुळे जिल्हाआयोजित सर्व शाखीय राज्यस्तरीय माळी समाज वधु वर परिचय मेळाव्याचे उद्घाटन भाजपा प्रदेश चिटणीस डॉ.सुशील महाजन यांच्या हस्ते करण्यात आले तसेच वधु वर पुस्तिका प्रकाशन मुरलीधर राजाराम महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माळी समाज वधु वर परिचय मेळाव्यात आलेल्या युवक युवतींनी आपला परिचय करून दिला. उपस्थित प्रमुख मान्यवर माळी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष संतोष इंगळे प्राचार्य डॉ.सुरेश नंदन, वसंतराव पाटील, हनुमंत वाडीले, हिलाल माळी, माळी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर माळी, प्रदेश उपाध्यक्ष प्राचार्य बी.एच. जाधव, सुभाष जगताप, भारती माळी, विलासराव माळी, मधुकर माळी, गुलाब माळी, प्राचार्य बी.बी. महाजन, शंकरराव खलाणे, मिलिंद सोनवणे, आर.के. माळी, विजय महाजन, प्राचार्य एस.टी. चौधरी, कैलास माळी, कैलास पाटील, सुमित चौधरी, महेंद्र जगताप, परमेश्वर माळी, आसाराम माळी, राकेश बोरसे, प्रकाश महाजन, दीपक माळी, अशोक जाधव, गोरख माळी यांच्यासह खानदेश माळी महासंघाचे समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात भावी शिक्षकांकडून नृत्याविष्कार सादर

**नंदुरबार, दि.१५ (प्रतिनिधी)- नंदुरबार तालुका विधायक समितीच्या शिक्षण शास्त्र महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून भावी शिक्षक विद्यार्थ्यांनी संस्कृती आणि राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित नृत्यविष्कार सादर करून कलेचे दर्शन घडविले.**



नंदुरबार तालुका विधायक समितीचे प्रशासकीय अधिकारी महेंद्र रघुवंशी, यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य पुष्पेन्द्र रघुवंशी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाकडून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम वर्ष बीएड,द्वितीय वर्ष बीडच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेत आपल्यातील सुप्त कलागुणांना वाव दिला. प्राचार्य नंदा वसावे यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दिपा पाटील, कैलास चौधरी, सक्‍हेल अग्रवाल, प्रिती हिवराळे तसेच कार्यालयीन कर्मचारी प्रमोद पवार, ललित परदेशी, आनंदा पाटील, भुषण पाटिल, समाधान पाटील, गौरव बागुल यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# वाल्मिकी विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण संपन्न



**शहादा, दि.१६ (का.प्र.)- वाल्मिकी माध्यमिक विद्यालय पुरुषोत्तमनगर येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनकल्याण विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील होते.**

विद्यालयात झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून छोटूभाई पाटील (संचालक जनकल्याण विश्वस्त मंडळ पुरुषोत्तमनगर),अशोक सुपडू पाटील (कार्यकारी संचालक सातपुडा साखर कारखाना), मिलिंद पाटील (जनरल मॅनेजर सातपुडा साखर कारखाना),श्रीमती अलका जायस्वाल (केंद्रप्रमुख लोणखेडा केंद्र) , ग्रामपंचायत सदस्या सौ.वर्षाताई पाटील उपस्थित होत्या. इयत्ता पहिली ते दहावीचा विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमास वाल्मिकी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सीमा पाटील, खाजगी प्राथमिक शाळेचा मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना पाटील व पर्यवेक्षक महेश कुलकर्णी उपस्थित होते.

## विजय नायर यांच्या मातोश्रींचे निधन




धुळे, दि.१६- शहरातील एअरकंडीशन विक्रेते सुप्रसिद्ध विजय नायर यांच्या मातोश्री यमुना वेलायुधन नायर (८६) यांचे दि.१५ रोजी रात्री १०.३० वा. वृद्धापकाळाने निधन झाले. ग्रीन पार्क, ऐंशी फुटी रोड येथील त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघाली असता अनेक प्रतिष्ठीत लोक यावेळी उपस्थित होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, नातू, पणतू असा परिवार आहे.

**पाहिजेत**

राऊळ खडी क्रशर
(दिवानमळा)
१) सुपरवायझर अनुभवी
२) जेसीबी ड्रायव्हर खडीक्रशरवर
३) खडी टिपर डंपरसाठी ड्रायव्हर
-: पत्ता :-
वसुंधरा डेअरीसमोर, एमआयडीसी, दिवान मळा, लळींग ता.धुळे
भेटण्याची वेळ : १० ते २
9881394438

**पाहिजेत**

१) लॉजिंगसाठी व बारसाठी कॉम्प्युटरचे ज्ञान असलेले मॅनेजर
२) रुम बॉय/हेल्पर
३) वेटर पाहिजेत.
हॉटेल प्रितम पॅलेस
साक्रीरोड, महापालिकेसमोर,धुळे
9765901313



# सेवा हॉस्पिटलमध्ये मोफत आरोग्य शिबिर

**धुळे, दि.१६- येथील सेवा सुपर स्पेशलिटी अँड क्रिटिकल केअर सेंटर येथे रविवारी डायबेटिक व हृदय (मेडिसिन) संबंधी मोफत आरोग्य शिबीर संपन्न झाले.**

यावेळी डॉ.अभिजीत मोरे यांनी रुग्णांना मोफत मार्गदर्शन व तपासणी केली. शिबिरात आलेल्या सर्व रुग्णांच्या ब्लड शुगर इ. तपासणी मोफत करण्यात आली. या रुग्णांपैकी काही रुग्णांना पुढील मोफत उपचारासाठी दाखल करून घेण्यात येणार आहे. सदर शिबिराला उदंड प्रतिसाद मिळाला असून आरोग्य शिबिर यशस्वी होण्यासाठी हॉस्पिटल चे संचालक डॉ.राजेश अग्रवाल, डॉ.कुणाल मेहता, डॉ.प्रशांत एम.पाटील, डॉ.प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**भरती**

सरकारद्वारा रजिस्टर कंपनीत मुला-मुलींची डायरेक्ट भरती!
पात्रता : १० वी ते पदवीधर व १८ ते २८ वर्षे.
पगार ७००० च्या पुढे! राहणे+जेवण फ्री
(ग्रामीणांना प्राधान्य)
पत्ता : वाडीभोकर रोड, धुळे
फोन : 8469268899




हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०